सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१३-२०१४

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**ठाणे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत राबविण्यांत येणा-या विविध कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल**

# आठवा अहवाल

**( हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक ....... जून, २०१४ रोजी सादर करण्यात आला )**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई, ४०० ०३२.
जून, २०१४.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१३ -२०१४)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**ठाणे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद यंत्रणेमार्फत राबविण्यांत येणा-या विविध कल्याणकारी योजनासंबंधीचा अहवाल**

# आठवा अहवाल

एचबी ३४७—१

## अनुसूचित जमाती कल्याण समिति
## (२०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) श्री. शरद गावीत, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. के. सी. पाडवी, वि.स.स.
(३) श्री. केवलराम काळे, वि.स.स.
(४) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.
(५) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(६) श्री. दीपक आत्राम, वि.स.स.
(७) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स.
(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
(९) श्री. विजयकुमार घोडमारे, वि.स.स.
**(१०) श्री. धनराज महाले, वि.स.स.
*(११) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(१२) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.
(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
***(१४) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१५) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.
(३) श्री. दिलीप येवला अवर सचिव (समिती)
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

---

**टिपा :** * (१) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी केलेल्या शिफारशीवरून समिती सदस्य श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. दौलत दरोडा, वि.स.स. यांची दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

** (२) श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला असल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. धनराज महाले, वि.स.स यांची समिती सदस्य म्हणून दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

*** (३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांची मुदत दिनांक १२ मार्च, २०१४ रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ मे, २०१४ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.





## अनुसूचित जमाती कल्याण समिति
## २०१२-२०१३

**समिती प्रमुख**

(१) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. के. सी. पाडवी, वि.स.स.
(३) श्री. केवलराम काळे, वि.स.स.
(४) श्री. दीपक आत्राम, वि.स.स.
(५) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(६) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.
(७) श्री. शरद गावित, वि.स.स.
(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
*(९) श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.
**(१२) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.
(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
***(१५) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.
(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

---

**टिपा :** * (१) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी केलेल्या शिफारशीवरून समिती सदस्य ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स, यांच्याऐवजी श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

** (२) श्री. एस. क्यु. जामा, वि.प.स. यांचा सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यामुळे समितीवरील रिक्त झालेल्या पदी श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

***(३) डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक ७ जुलै, २०१२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने मा. सभापती यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१२ रोजी त्यांची समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती
## २०१०-२०११

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य**

**(२) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.
(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.
(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.
(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.
(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.
(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.
(१२) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.
*(१३) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.
(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

---

**टिपा :** *(१) श्री.राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स. यांची दिनांक १७ फेब्रुवारी, २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

**(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स. यांची उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री. हरिदास भदे, वि.स.स. यांची दिनांक ७ मार्च, २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.



# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून **समितीचा आठवा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

समितीने ठाणे जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, व अनुशेष तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक १२ ते १४ फेब्रुवारी, २०११, या कालावधीत मुख्याधिकारी, जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, जिल्ह्यातील पोलीस उप अधीक्षक व प्रकल्प अधिकारी यांचे समवेत बैठक घेतली. उक्त बैठकीच्या वेळी समितीने जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत व प्रकल्प कार्यालयातंर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात आलेल्या कामांना भेटी देऊन चर्चा करण्यात आली. उक्त बैठकीत चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सखोल विचार करून समितीने त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १३ मे, २०१४.

**शरद गावित,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

## अनुसूचित जमाती कल्याण समिती

## अहवाल

### जिल्हा परिषद, ठाणे

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०११ या कालावधीतील ठाणे जिल्ह्याच्या भेटीत समितीने दिनांक १२ जानेवारी २०११ रोजी जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयास भेट दिली. सदरहू भेटीत समितीसमवेत झालेल्या बैठकीच्या वेळी ठाणे जिल्हा परिषदेमधील अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या विसंगतीबाबत माहिती देताना जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी समितीला सांगितले की, राज्यातील ७ जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे अशा जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जमातीकरिता सरळसेवेने भरती करताना ठाणे, नाशिक, धुळे या जिल्ह्यांसाठी २२ टक्के, यवतमाळ जिल्ह्यासाठी १४ टक्के, गडचिरोली जिल्ह्यासाठी २४ टक्के, चंद्रपूर जिल्ह्यासाठी १५ टक्के व रायगड जिल्ह्यासाठी ९ टक्के आरक्षण आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी सरळसेवा भरतीमध्ये २२ टक्के आरक्षण असून पदोन्नतीमध्ये ७ टक्के आरक्षण आहे.

ठाणे जिल्हा परिषदेने जिल्ह्यात जे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत, त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांना जोडून इंग्रजी माध्यमाचा नर्सरी वर्ग सुरू करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. ठाणे जिल्ह्यात ६० लाख शहरी लोकसंख्या असून २३ लाख ग्रामीण लोकसंख्या आहे. मुलांना इंग्रजी शाळेत दाखल करण्याकडे लोकांचा कल वाढत चाललेला आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. तसेच त्याचा परिणाम जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेच्या पटसंख्येवर होत आहे. म्हणून ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी शिकवण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नर्सरीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. माहे ऑगस्ट, २०१० पासून सर्व तालुक्यांमध्ये एक किंवा अधिक याप्रमाणे एकूण २४ नर्सरी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. मुलांमध्ये शाळेबाबत आनंदभाव वाढावा यासाठी नर्सरी वर्गातील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी विविध रंगातील बेंच तसेच विविध शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी मानधनावर नर्सरी टिचर, मदतनीस, पर्यवेक्षक यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणारा दुसरा नाविन्यपूर्ण उपक्रम व्हीडिओ कॉन्फरन्सींग आहे. यासाठी मंत्रालय ते जिल्हा परिषद ८ एमबीपीएसची जोडणी घेतलेली आहे व जिल्हा परिषद मुख्यालय ते सर्व १३ पंचायत समित्या यांची ४ एमबीपीएसद्वारे जोडणी केलेली आहे. जिल्हा मुख्यालय ते सर्व पंचायत समित्यांना याद्वारे एकाच वेळी कनेक्ट केले जाते. या सुविधेमुळे व्हीडिओ कॉन्फरन्सींगद्वारे १३ पंचायत समितीतील अधिका-यांना एकाच वेळी जिल्हास्तरावरून संबोधित करणे शक्य झाले आहे. या सुविधेमुळे तालुका स्तरावरून जिल्ह्यास येताना अधिकारी यांचा वेळ व पर्यायाने खर्च देखील वाचणार आहे. प्रशासनामध्ये इतर सभांनाही व्हीडिओ कॉन्फरन्सींग सुविधेचा उपयोग करून प्रशासन गतिमान करून सेवेचा दर्जा वाढणार आहे. या सुविधेचे उद्‌घाटन मुख्य सचिव तसेच खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या हस्ते केले होते.

आणखी एक नाविन्यपूर्ण उपक्रम व्हर्च्युअल ट्रेनिंग सेंटर एमएमआरडीए व व्हॅल्यूएबल ग्रुप यांच्या सामाजिक बांधिलकीतून आणि जिल्हापरिषदेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतून राबविण्यात येत आहे. यामध्ये तालुक्यातील शिक्षकांना जिल्हास्तरावरून तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणार आहे. अद्ययावत माहिती तंत्रज्ञानामुळे जिल्हास्तरावरून ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना मूलभूत प्रशिक्षण देणे शक्य होणार आहे. ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या डॉक्टरांना तज्ज्ञांकडून वेळोवेळी प्रशिक्षण व वैद्यकीय सल्ला परिणामकारकरित्या देणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये ५० टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत व ५० टक्के कामे कार्यालयीन यंत्रणेमार्फत करावयाची आहेत. कोकण विभागामध्ये आणि विशेषतः ठाणे भागामध्ये वैयक्तीक लाभाच्या योजनेमध्ये जवाहर विहिरीचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. कृषीच्या बाबतीत जास्त क्षमता आहे. त्यादृष्टीने वनराई बंधा-याची योजना मागच्या वर्षापासून मोठ्या प्रमाणात राबविलेली आहे.

नोंदणी केलेल्या कुटुंबांची संख्या २ लाख ४२ हजार असून जॉबकार्ड वाटप केलेल्या कुटुंबांची संख्या २,०८,२८८ आहे. बँकेत किंवा पोस्टात खाते उघडलेल्या मजुरांची संख्या ४,३०,८६४ आहे.या भागात शेततळी, वनराई बंधारे अशी कामे घेतलेली आहेत. वनराई बंधा-यांमध्ये सिमेंटच्या रिकाम्या गोणीत माती-मुरूम भरून त्या गोण्या रचल्या जातात. तसेच मध्ये काळी माती भरून वनराई बंधारा बांधला जातो. सन २००९-२०१० मध्ये १७०५ वनराई बंधारे पूर्ण केले. त्यावर १,३७,३२,००० रूपये खर्च झालेला आहे. यामध्ये १,१७,१०३ एवढी मनुष्यदिन निर्मिती झाली. वनराई बंधा-यांमुळे रोजगार उपलब्ध झाला. तसेच पाणीसाठा निर्माण झाला. त्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची पातळी वाढली. वनराई बंधा-याचा खर्च जास्तीत जास्त १० ते १५ हजार रूपये असतो पण त्याचा फायदा खूप मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. या भागामध्ये जास्त पाऊस पडतो पण पावसाचे पाणी वाहून जाते. नोव्हेंबरनंतर पाणी संपते. माहे डिसेंबर, जानेवारी मध्ये जव्हार, मोखाडा भागात पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते, त्यामुळे त्या ठिकाणी पाणी थांबवून ठेवणे आवश्यक आहे. मागच्या वर्षी जे वनराई बंधारे बांधलेले आहेत त्या ठिकाणी पाझर तलावासारखा सांडवा काढलेला असल्याने पाणी वाहून गेलेले नाही. त्याला सिमेंट बंधारा हा पर्याय होऊ शकतो, परंतु ते एमआरईजीएसमध्ये ६०:४० च्या नॉर्म्समध्ये बसत नाही. ठक्करबाप्पा योजनेमध्ये रस्त्यापेक्षा जलसंधारणाला प्राधान्य दिले तर ते होऊ शकते. ज्या ठिकाणी चांगल्या साईट्स आहेत त्या ठिकाणी सिमेंट बंधारे करता येतील. मागच्या वर्षी मुरबाड तालुक्यामध्ये वनराई बंधारा केला. एका बंधा-याचा खर्च १० हजार रूपये येतो. त्या ठिकाणी शेतक-याने ढोबळी मिरचीचे उत्पादन घेतले. त्याचे उत्पन्न ३ ते ४ लाखापर्यंत होते.

काही ठिकाणी एल-शेफ बंधारे सुद्धा घेतलेले आहेत. या वर्षी ठाणे जिल्हापरिषदेचे साधारणतः ४८०० बंधा-यांचे नियोजन आहे. आतापर्यंत १८११ बंधारे बांधलेले आहेत. जनावरांना सुद्धा या पाण्याचा फायदा झालेला आहे. या वर्षी पर्यावरण संतुलित ग्राम समृध्दी योजना घेतलेली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्या २३ लाख ४५ हजार आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ४७ लाख वृक्षांची लागवड केलेली आहे. रस्त्याच्या दुतर्फासुध्दा झाडे लावलेली आहेत. सार्वजनिक ठिकाणी झाडे लावलेली आहेत. या वर्षी एमआरईजीएसमध्ये सुध्दा वृक्ष लागवड करण्यास परवानगी मिळालेली आहे. जिल्हा परिषदेतील एमएमआरडीएनेसुध्दा रोपांसाठी मदत केलेली आहे. बाबूंच्या पट्ट्यांचे कंपाऊंड केलेले आहे. एमआरईजीएसबाबत सामाजिक वनीकरण विभागाने निकष ठरविले आहेत आणि ग्रामपंचायतीने त्या विभागामार्फत झाडे लावली आहेत. पर्यावरण संतुलन योजनेमध्ये जेवढी झाडे लावली जातील त्यापैकी ५० टक्के झाडे जगवली तर अनुदान मिळते.

ठाणे जिल्ह्यामध्ये बायोमेट्रिक अटेंडन्स योजना सुरू करण्यात आली आहे. ओटीएसपी आणि केंद्रीय प्राथमिक शाळा व सर्व पंचायत समिती क्षेत्रामध्ये ही योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागामध्ये इंटरनेटची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ही योजना अजून प्रत्येक शाळेमध्ये पोहोचू शकली नाही, परंतु केंद्रीय प्राथमिक शाळेपर्यंत पोहोचली आहे. त्याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यामधील दोन तालुक्यांमध्ये व्हर्च्युअल ट्रेनिंग सेंटरची योजना सुरू केली आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासी विभाग जास्त आहे. आदिवासी विभागामध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी चांगले शिक्षक मिळत नाहीत याकरिता संपूर्ण जिल्ह्यामध्ये व्हर्च्युअल क्लास सुरू करण्याबाबात एमएमआरडीए आणि प्रायव्हेट सेक्टरला विनंती केली आहे. या कामासाठी एमएमआरडीए आणि प्रायव्हेट सेक्टरकडून सॉफ्टवेअर पुरविले जाणार आहे तर जिल्हा परिषदेकडून सर्व शिक्षा अभियान योजनेमधून फर्निचर पुरविले जाणार आहे. याकरिता वर्षाला ४ कोटीचे अनुदान मिळणार आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेमधून प्रत्येक तालुक्यामध्ये तालुका रिसर्च सेंटरमार्फत प्रत्येक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. आणि योजनेद्वारे स्कॉलरशिपच्या परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा प्रशिक्षण दिले जाणार आहे याकरिता एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र केवळ शहरापुरते मर्यादित न ठेवता ते ग्रामीण भागापर्यंत वाढविण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. प्रत्येक व्हर्च्युअल क्लासरूम मध्ये ५० शिक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कुपोषित बालकांच्या बाबतीत या जिल्ह्यामध्ये ग्रेड ३, ग्रेड ४ च्या मुलांचे प्रमाण जास्त आहे. याकरिता शासनाने सन २०१०-२०११ या वर्षामध्ये निकष बदलले असून ग्रेड ३ आणि ग्रेड ४ ऐवजी सॅम आणि मॅमचे तालुके केले आहेत. त्यानुसार जिल्ह्यामध्ये ६६०७ सॅम आणि २६,५०० मॅमची बालके आहेत. यावर्षी बाल विकास केंद्रामार्फत पहिला ४०७ आणि दुसरा ४२९ बालकांचा असे दोन राऊंड घेण्यात आले. त्यामुळे ७५ टक्के बालके सॅममधून मॅममध्ये गेली.



**(१) जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :-**

**जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग ३ व ४ च्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी कर्मचारी वर्गाच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनेबाबत समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीनुसार जिल्हा परिषद, ठाणे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आढावा घेतला.**

जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये एकूण मंजूर असलेल्या पदांपैकी विविध संवर्गात सरळ सेवेने कार्यरत असलेल्या व अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या वर्ग-३ मध्ये मार्च-२०१० अखेर एकूण २७६ पदे आणि वर्ग-४ मध्ये मार्च-२०१० अखेर एकूण २३ पदे रिक्त आहेत. **असा एकूण २९९ पदांचा अनुशेष आहे.** त्यापैकी जिल्हा परिषद कार्यालयात सरळसेवेने भरावयाच्या अनुसूचित जमाती वर्गातील कनिष्ठ सहाय्यकामध्ये **१९ पदांचा,** लघुलेखक निम्नश्रेणी मध्ये **१ पदांचा,** आरोग्य सेवक (पु) मध्ये **२६ पदांचा** आणि औषध निर्माता या संवर्गामध्ये **२२ पदांचा** अनुशेष आहे. त्यासाठी योग्य अर्हताप्राप्त उमेदवार न मिळाल्याने औषध निर्मात्याची पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती. परंतु नोकर भरतीवर बंदी असल्यामुळे नेमणूक करण्यात आली नाही, प्रयोगशाळा तंत्रज्ञांमध्ये **७ पदांचा** अनुशेष आहे. प्राथमिक शिक्षण विभागात अनुसूचित जमातीतील उप शिक्षकांचा **१५४ पदांचा** आणि विस्तार अधिकारी श्रेणी २ मध्ये **३ पदांचा अनुशेष असून सदर अनुशेषाची** रिक्त पदे भरण्याबाबत दिनांक ९ जुन, २०१० रोजी आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना पत्र पाठविले असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. अर्थ विभागामध्ये वरिष्ठ सहाय्यक लेखा यामध्ये **१ पदांचा** अनुशेष, कृषी विभागामध्ये विस्तार अधिकारी (कृषी) यामध्ये **१ पदाचा** ग्रामपंचायत विभागामध्ये ग्रामसेवक या संवर्गातील **८ पदांचा** व ग्रामविकास अधिकारी यामध्ये **१ पदाचा** अनुशेष आहे. तसेच जिल्हा परिषदेतंर्गत असलेल्या पाणीपुरवठा विभागातील **२ पदे,** पाटबंधारे विभागातील **३ पदे,** पशुसंवर्धन विभागातील **२ पदे** व बाल कल्याण विभागातील **२ पदाचा** अनुशेष आहे व सामान्य प्रशासन विभागातील वर्ग-४ मध्ये शिपाई संवर्गात **२३** पदाचा अनुशेष मागील १ वर्षापासून रिक्त आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये पदोन्नतीने भरावयाच्या व अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या शिक्षण विभागात विस्तार अधिकारी श्रेणी ३ मध्ये **२** केंद्र प्रमुख या पदांमध्ये **१** आणि मुख्याध्यापक यामध्ये **११ पदांचा** अनुशेष आहे. सामान्य प्रशासन विभागातील हवालदार संवर्गातील **३,** आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (पु.) संवर्गातील **२,** बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता संवर्गातील **२,** अर्थ विभागातील वरिष्ठ सहायक संवर्गात **१** असा एकूण **२२ पदांचा अनुशेष** आहे. **(प्रपत्र "अ")** जिल्हा परिषद कार्यालयातील विविध संवर्गात सरळ सेवा व पदोन्नतीने असलेला अनुशेष भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारस -**

**दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली, साक्षीच्यावेळी जिल्हा परिषद कार्यालयातील विविध संवर्गात असलेला अनुशेष भरण्यात आल्याबाबत जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केली आहे याबाबातची माहिती समितीला देण्यात आली नाही. जिल्हा परिषद कार्यालयातील विविध संवर्गात सरळ सेवेने भरावयाचा एकूण २९९ पदांचा शिल्लक असलेला अनुशेष भरण्यासाठी जिल्हयातील संबधित प्रकल्प कार्यालयाकडून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या नावांची यादी मागविण्यात यावी व रिक्तअसलेली पदे त्वरीत भरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा तसेच जिल्हा परिषद कार्यालयातील विविध संवर्गात अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांचा पदोन्नतीने भरावयाचा २२ पदांचा अनुशेष तात्काळ भरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हापरिषदेतील बांधकाम विभागातंर्गत स्थापत्य अभियंता सहाय्यकाची एकुण १२१ पदे मंजूर आहेत. आरक्षणानुसार अनुसूचित जमातीसाठी २७ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद भरण्यात आलेले आहे व **२६ पदांचा** अनुशेष आहे. २६ पदांचा अनुशेष असतांना त्यावेळी ४० पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती त्यामध्ये अनुसूचित जमातीची १८ पदे आहेत. सन १९९९ सालापासून ही पदे रिक्त आहेत. अन्य जातींची पदे भरली जातात मात्र अनुसूचित जमातीची पदे भरली जात नाहीत. सन १९९९ मध्ये २० पदे मंजूर झाली होती. त्यानंतर सन २००१ मध्ये पुन्हा २० पदे मंजूर झाली व तिस-या वेळी २० पदे मंजूर झाली होती. अशा प्रकारे टप्याटप्याने पदे मंजूर झालेली असताना मात्र एकच पद भरले आहे. मागील कालावधीतील अधिका-यांनी याप्रकरणी दुर्लक्ष केले असून अनुसुचित जमातीच्या जागांवर इतर मागासवर्गीय किंवा इतर प्रवर्गातील लोकांची भरती केली आहे. सन २००६ मध्ये जाहिरात दिली असती तर स्थापत्य अभियंता सहायक या पदासाठी आदिवासींची मुले मिळाली असती आणि हा २६ पदांचा अनुशेष शिल्लक राहिला नसता. तसेच बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता संवर्गात २ पदाचा अनुशेष आहे. **(प्रपत्र "अ")** अनुसूचित जमातीच्या लोकांच्या नेमणुका न करण्यास जबाबदार असणा-या तसेच संबधित कर्मचारी/ अधिकारी यांचेवर कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली.

शासन निर्णय दिनांक २० मे १९९९ अन्वये सहाय्यक कनिष्ठ अभियंता, मेस्त्री ग्रेड-१, मेस्त्री ग्रेड-२, लिपीक, मस्टर क्लार्क, समयपाल या सर्व पदांचे सुसूत्रीकरण करून त्याऐवजी एकच स्थापत्य अभियांत्रिकी सहायक हा नवीन संवर्ग निर्माण करण्यात आलेला आहे. सदरहू संवर्गात टप्याटप्याने १२१ पदे ठाणे जिल्हा परिषदेतंर्गत बांधकाम/पाटबंधारे/पाणीपुरवठा विभाग मिळून एकत्रितपणे मंजूर करण्यात आली आहेत.



सदर ७ संवर्गातील कर्मचा-यांच्या समावेशनासाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची निमिर्ती झाली असल्यामुळे या संवर्गातील कर्मचा-यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर प्राथम्याने सामावून घ्यावे व तद्नंतर उर्वरित स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची रिक्त पदे सेवाप्रवेश नियमानुसार व विहित केलेल्या टक्केवारीनुसार भरण्यात यावी अशा सूचना दिनांक २३ नोव्हेंबर, २००६च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार ठाणे जिल्हा परिषदेतंर्गत बांधकाम/पाटबंधारे/पाणीपुरवठा विभाग मिळून एकत्रितपणे १२१ पदांमध्ये समावेशनाची पदे प्राथम्याने भरण्याची कार्यवाही केलेली आहे. एकत्रित १२१ पदे भरताना अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे आरक्षणानुसार २७ पदे भरणे आवश्यक होती. त्यापैकी समावेशनाने अनुसूचित जमातीचे ०१ पद भरलेले आहे. दिनांक १९ मार्च २०१२ रोजी पात्र असलेल्या अनुसूचित जमातीचे ०४ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यापैकी ३ उमेदवार हजर झाले आहेत. दिनांक ३ सप्टेंबर, २०१२ रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र १० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली त्यापैकी ८ उमेदवार हजर झालेले आहेत. दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातून अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्वरीत ११ पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती. परंतु एकही उमेदवार पात्र ठरलेला नाही.

**अभिप्राय व शिफारस -**

**स्थापत्य अभियंता सहाय्यकाची एकुण १२१ पदे मंजूर असून आरक्षणानुसार अनुसूचित जमातीसाठी २७ पदे मंजूर आहेत त्यापैकी एक पद भरले असून २६ पदांचा अनुशेष आहे. समितीने सन २००६ मध्ये जाहिरात दिली असती तर स्थापत्य अभियंता सहायक या पदासाठी आदिवासींची मुले मिळाली असती व २६ पदांचा अनुशेष शिल्लक राहिला नसता. त्यापैकी समावेशनाने अनुसूचित जमातीचे ०१ पद भरलेले आहे. दिनांक १९ मार्च २०१२ रोजी अनुसूचित जमातीच्या ०४ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. दिनांक ३ सप्टेंबर २०१२ रोजी अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र १० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली आहे. या प्रवर्गातील उर्वरीत १२ पदे भरण्यासाठी दिनांक १२ एप्रिल २०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. परंतु, एकही उमेदवार पात्र ठरलेला नसल्याने सदर स्थापत्य अभियंता सहायकाची पदे भरण्यासाठी जिल्हयातील संबधित प्रकल्प कार्यालयाकडून उमेदवारांच्या नावांची यादी मागविण्यात यावी व रिक्त असलेली पदे त्वरीत भरुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता संवर्गात २ पदांचा अनुशेष त्वरित भरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**खाजगी माध्यमिक शाळांना मान्यता शासनाकडून देण्यात येते. जिल्ह्यातील ४७० अनुदानित शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील १५७ पदे रिक्त आहेत. खाजगी अनुदानित शाळा ६१६ आहेत. त्यापैकी १४६ शाळा अल्पसंख्यांक आहेत त्यांना आरक्षण लागू नाही. ४७० अनुदानित शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील रिक्त असलेली १५७ पदे भरण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(२) जिल्हा परिषद कार्यालयातील जात पडताळणी विषयक प्रलंबित असलेली प्रकरणे :-**

जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग ३ मध्ये ७६३ आणि वर्ग ४ मध्ये ५३ अशी एकूण ८१६ कर्मचा-यांची प्रकरणे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्यात आली होती, त्यापैकी सन १९९५ पूर्वीची ५४२ आणि सन १९९५ नंतरची १४९ अशी मिळून ६९१ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे दाखल करण्यात आली. उर्वरित १२५ कर्मचा-यांकडून कागदपत्रे प्राप्त न झाल्याने ती प्रकरणे प्रलंबित आहेत. कर्मचा-यांची नियुक्ती झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये जे कर्मचारी १५ जून १९९५ पूर्वी नोकरीला लागले असतील आणि जर त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसेल तर त्यांना संरक्षण आहे. परंतु, अशा कर्मचा-यांना कोणत्या संवर्गामध्ये दाखविण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीबाबतचे प्रस्ताव दाखल न करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे. बोगस आदिवासी असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यांना कागदपत्रे सादर करण्याची मुदत देऊन सुध्दा जर ते कागदपत्रे सादर करीत नसतील तर त्यांना निष्कासित केले पाहिजे. जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या १५ कर्मचा-यांची प्रकरणे अवैध आहेत असे जात पडताळणी समितीकडून कळविण्यात आले आहे. कर्मचा-यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता सिध्द न झाल्यामुळे अनुसूचित जमातीच्या इतर उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. याबाबत जिल्हा परिषदेकडून कारवाईच्या बाबतीत दिरंगाई झालेली असल्याने अशा कर्मचा-यावर कोणती कारवाई केली आहे त्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

तसेच सह आयुक्त जात पडताळणी समिती यांच्या अहवालानुसार २१ प्रकरणे निकाली काढण्यात आली व १४८ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, असा त्यांनी अभिप्राय दिलेला आहे. सध्या जिल्हा परिषद कार्यालयातील सन १९९५ पूर्वीची ५७८ प्रकरणे व सन १९९५ नंतरची २३८ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत ती प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढली पाहिजेत. सन १९९५ पूर्वी जे कर्मचारी नोकरीला लागले आहेत व ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरले आहे त्यांना



पदावनत करावे. तसेच सन १९९५ पूर्वीच्या ५४२ प्रकरणांच्या बाबतीत मंत्री गटाचा निर्णय होईपर्यंत त्यांना संरक्षण देण्यात आले आहे व सन १९९५ नंतर नोकरीला लागलेल्या १४९ कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्यात आले पाहिजे. तसेच ज्या १२५ कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले नाहीत अशा कर्मचा-यांवर कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत समितीला पुढील प्रमाणे लेखी माहिती देण्यात आली.

दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी नियुक्ती दिलेले व दिनांक १५ जून, १९९५ नंतर पदोन्नती दिलेले असे एकूण ८५ कर्मचारी आहेत त्यापैकी ८१ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे उर्वरित ४ कर्मचा-यांपैकी २ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून उर्वरीत २ प्रकरणापैकी १ विभागीय जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक यांचेकडे व १ प्रकरण विभागीय जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती ठाणे यांचेकडे सादर केले आहे.

तसेच साक्षीच्या बैठकीच्यावेळी अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती, ठाणे यांच्याकडून पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या वर्ग ३ व ४ मध्ये सन १९९५ च्या अगोदर व सन १९९५ नंतर सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाची जात पडताळणी प्रमाणपत्र तपासणी समितीकडून करण्यात आलेल्या पडताळणी प्रमाणपत्राची सद्यस्थिती खालीलप्रमाणे:-

**जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले कर्मचारी**

| वर्ग-३ | | | वर्ग-४ | | | वर्ग-३ व वर्ग-४ चे एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण | १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण | १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण |
| ८४४ | ९७७ | १८२१ | २३ | ६९ | ९२ | ८६७ | १०४६ | १९१३ |

**जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेले कर्मचारी**

| वर्ग-३ | | | वर्ग-४ | | | वर्ग-३ व वर्ग-४ चे एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण | १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण | १९९५ पूर्वीचे | १९९५ नंतरचे | एकूण |
| ५३८ | २२५ | ७६३ | ४० | १३ | ५३ | ५७८ | २३८ | ८१६ |

जात पडताळणीसाठी विभागीय जाती प्रमाणपत्र समितीकडे १२५ प्रस्ताव प्रलंबित आहेत. संबंधित कर्मचा-यांनी कागदपत्रे सादर न केल्याने जात पडताळणी झालेली नाही.

अनुसूचित जमाती कल्याण समितीचे भेटीचे वेळी दिनांक १५ जून १९९५ नंतर सेवेत लागलेले परंतु जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेले २३८ कर्मचारी होते. सदरच्या २३८ कर्मचा-यांपैकी २२९ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. उर्वरित ०९ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही किंवा जात वैधता प्रमाणपत्र सुध्दा सादर केलेले नाही. त्यामध्ये ३ कर्मचारी मयत आहेत, २ प्रकरणे न्यायप्रविष्ट, १ कर्मचारी सेवानिवृत्त, ३ कर्मचा-यांना सेवेतून कमी करणेसाठी अंतिम कारणे दाखवा नोटीस दिली आहे. सन १९९५ पूर्वीच्या १२५ कर्मचा-यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत. त्यामुळे ती प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच सन १९९५ नंतर सेवेत लागलेल्या २२९ कर्मचा-यांपैकी १०४ कर्मचा-यांची प्रकरणे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत.

**अभिप्राय व शिफारशी -**

**जिल्हा परिषद कार्यालयातील एकूण ८१६ प्रकरणांपैकी सन १९९५ पूर्वीची ५४२ आणि सन १९९५ नंतरची १४९ अशी मिळून ६९१ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे दाखल करण्यात आली आहेत. उर्वरित १२५ कर्मचा-यांकडून कागदपत्रे प्राप्त न झाल्याने ती प्रकरणे प्रलंबित आहेत. ज्या १२५ कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले नाहीत अशा कर्मचा-यांवर तात्काळ कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**सन १९९५ नंतर सेवेत लागलेल्या २२९ कर्मचा-यांपैकी १०४ कर्मचा-यांची प्रकरणे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. प्रलंबित असलेल्या प्रकरणी जात पडताळणी समितीने तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच सन १९९५ पूर्वीच्या ५४२ प्रकरणांना मंत्री गटाचा निर्णय होईपर्यंत त्यांना संरक्षण देण्यात आले आहे या प्रकरणी मंत्री गटाचा झालेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या १५ कर्मचा-यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडून अवैध ठरविण्यात आलेली असल्याने या कर्मचा-यांविरुध्द जिल्हा परिषद कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(३) जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेकडील नळ पाणी पुरवठा योजनेची अपूर्ण असलेली कामे :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दिनांक १५ जानेवारी, २०११ रोजी झालेल्या आढावा बैठकीत जिल्हा परिषद यंत्रणेकडील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेबाबत माहिती घेत असतांना समितीने





ठाणे जिल्ह्यात १४५५ नळ पाणीपुरवठा योजना अपूर्ण आहेत. ग्रामसेवक शासकीय कर्मचारी असल्याने जबाबदारीने काम करू शकतात. लोकांनी पाणी मिळण्यासाठी पैसे दिलेले आहेत. तेव्हा अपूर्ण योजना पूर्ण होण्यासाठी मार्ग काढला पाहिजे, यापुढील काळात ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकास ग्राम पाणीपुरवठा समितीचे सचिव म्हणून नेमले तर त्यांना त्या कामासाठी जबाबदार धरता येईल. म्हणून या समितीचे सचिव ग्रामसेवक असावेत, तसेच ग्राम पाणीपुरवठा योजनेच्या कामात जे अधिकारी/कर्मचारी गैरव्यवहार करतील त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करावा, अशी समितीने सूचना केली.

पाणीपुरवठा योजनेसाठी कोणत्या वजनाचे, दर्जाचे पाईप घ्यावेत हे अंदाजपत्रकात नमूद केलेले असते. आदिवासी उप योजना क्षेत्रांतर्गत आराखडा तयार केल्यानंतरच संबंधित अधिकारी त्या अंदाजपत्रकाला मान्यता देतात. परंतु यांत्रिक मान्यता मात्र विभागामार्फतच दिली जात असल्यामुळे तो विभाग यासाठी जबाबदार आहे. विक्रमगड येथे ३ योजनांच्या कामासंबंधी गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अधिक खुलासा करावा अशी समितीने पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, "ग्राम पाणी पुरवठा समितीला" संपूर्ण अधिकार दिलेले आहेत, परंतु जबाबदारी काहीही ठेवलेली नाही. सरपंचांना या समितीचे अध्यक्ष नेमले पाहिजे. मध्यंतरी ग्रामसेवकांना सचिव नेमण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. परंतु ते रद्द केले आहे. कामांचे मूल्यांकन झाल्याशिवाय, शाखा अभियंता व उप अभियंता यांनी प्रमाणपत्र दिल्याशिवाय चेक रिलीज होत नाही. ज्या-ज्या ठिकाणी मूल्यांकनापेक्षा जास्त निधीची उचल करण्यात आली आहे त्या ठिकाणी व्हेरिफिकेशन करून पोलिसात गुन्हे दाखल केले आहेत."

ठाणे जिल्ह्यातील १४५५ पैकी २१४ नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत. परंतु, कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या उत्तरावरुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात नळ पाणीपुरवठा योजनांची २१४ कामे पूर्ण झाली असतील असे वाटत नाही. पूर्ण झालेल्या कामांची तपासणी उप मुख्य कार्यकारी अधिका-यांमार्फत करण्यात यावी. तसेच अपूर्ण कामांचे जोपर्यंत लेखापरीक्षण केले जात नाही तोपर्यंत त्यांना अटक करता येत नाही. अटक करण्यापूर्वी योग्य लेखापरीक्षण करण्यात यावे. अन्यथा, त्यांच्यावर अपूर्ण कामासाठी फौजदारी गुन्हे दाखल करावे, असे समितीने मत व्यक्त केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीच्या सूचनेनुसार लेखापरीक्षण करून ४-५ लोकांविरुद्ध गुन्हे दाखल केले जातील. या कामासाठी यंत्रणेच्या अधिका-यांनी ७९ लाख रुपये वितरित केलेले असून कामांचे मूल्यांकन ८१ लाख इतके झालेले आहे. या कामाबाबत तक्रार आल्यानंतर ती तक्रार कार्यकारी अभियंत्यांकडे पाठवून देण्यात आली असून यासंबंधी चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे असे समितीला सांगितले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीला ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, ठाणे या यंत्रणेने ठाणे जिल्ह्यातील १४५५ नळपाणी पुरवठा योजनांपैकी २१४ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. अपूर्ण असलेल्या

कामाबाबत व पाणी पुरवठा योजनामध्ये झालेल्या अपहाराबाबत केलेल्या कार्यवाहीची लेखी स्वरुपात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

ठाणे जिल्ह्यांतील एकूण १४५५ योजनांपैकी ६९९ योजना अंतिम करण्यात आलेल्या असून १९५ योजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. तसेच ४०३ योजनामधून तात्पुरत्या स्वरुपात पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे आणि १३ योजनांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. उर्वरित १०१ योजनाची कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत व ४४ योजना रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच पाणी पुरवठा योजनामध्ये झालेल्या अपहाराबाबत मुरबाड तालुक्यातील (१) किसळ (२) खोपिवली-खुटारवाडी (३) खानिवरे-ठाकूरवाडी (४) करचोंडे-बोरवाडी (५) वेळूक व वाडा तालुक्यातील (६) गारगाव-चिंचपाडा (७) गारगाव-टोपलेपाडा (८) गारगाव-पिंजाळ व शहापूर तालुक्यातील (९) बावरेवाडी-साकडबाव (१०) मुसई-मुसईवाडी व विक्रमगड तालुक्यातील (११) केव (१२) देहरजे (१३) साखरे अशा एकूण १३ गावातील समितींच्या पदाधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने मुरबाड व वाडा तालुक्यातील ग्रामीण पाणी पुरवठा समितीच्या पदाधिका-यांवर फौजदारी गुन्हे केव्हा दाखल करण्यात आले व त्यांची सद्य:स्थिती काय आहे अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, "यासंदर्भात बरीच चर्चा झाली असून १३ प्रकरणांमध्ये फौजदारी प्रक्रिया दाखल केली आहे. आता ब-याच प्रकरणातील कामे सुरू झाली आहेत. ४९ प्रकरणांमध्ये पाणी पुरवठा योजना अडचणीची ठरली होती. जेवढे काम झाले होते ते आता बंद करून टेंडर काढण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. दोषी व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करून अपहारित रकमेचा हिशोब घेतला जाणार आहे असे समितीला सांगितले.

दोषी व्यक्तिंवर गुन्हे दाखल करावेत. परंतु जेवढे काम झालेले असेल तेवढे पूर्ण करावे. मात्र एखाद्या ठिकाणी ४० टक्के काम झाले असल्यास त्याबाबत काय केले जाणार आहे. अशी समितीने पुन्हा विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, काही ठिकाणी पाणीपुरवठा करण्याकरिता पाईपलाईन टाकली असून तेथे टाकी बांधण्याचे काम होणार आहे. परंतु पाणीपुरवठा समितीचे असे म्हणणे आहे की, बजेटमधून ही सर्व कामे पूर्ण होऊ शकणार नाहीत. गावातील एक-एक काम पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे साधारणपणे ५० गावे एकत्रित करून प्रत्येक गावात जे काम अपूर्ण राहिले असेल त्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत एकत्रित टेंडर काढून अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील प्रगतीपथावर असलेल्या २५३ पाणीपुरवठा योजनांची कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्याचे निदेश समितीने दिले.





**अभिप्राय व शिफारशी -**

**जिल्हा परिषदेने ग्राम पाणीपुरवठा समितीला कामांचे संपूर्ण अधिकार दिलेले आहेत, परंतु जबाबदारी काहीही ठेवलेली नाही. सरपंचांना या समितीचे अध्यक्ष नेमले पाहिजे. मध्यंतरी ग्रामसेवकांना सचिव नेमण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. ग्रामसेवक शासकीय कर्मचारी असल्याने जबाबदारीने काम करू शकतात परंतु ते परिपत्रक आता रद्द केले आहे. ठाणे जिल्ह्यातील अपूर्ण असलेल्या १४५५ नळ पाणीपुरवठा योजनांपैकी २१४ योजना पूर्ण झाल्या आहेत परंतु आदिवासी उपयोजना क्षेत्रात नळ पाणीपुरवठा योजनांची २१४ कामे पूर्ण झाले असतील असे वाटत नाही. पूर्ण झालेल्या कामांची तपासणी उप मुख्य कार्यकारी अधिका-यांमार्फत करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. या कामासाठी यंत्रणेच्या अधिका-यांनी ७९ लाख रुपये वितरित केलेले असून कामांचे मूल्यांकन ८१ लाख इतके झालेले आहे. ज्या-ज्या ठिकाणी कामांसाठी मूल्यांकनापेक्षा जास्त निधीची उचल करण्यात आली आहे. त्याठिकाणी पुन्हा तपासणी करून पोलिसात गुन्हे दाखल केले आहेत.तसेच अपूर्ण कामांचे जोपर्यंत लेखापरीक्षण केले जात नाही तोपर्यंत त्यांना अटक करता येत नाही. अपूर्ण कामांवर केलेल्या खर्चाची पूर्ण चौकशी करून व अपूर्ण कामांचे लेखापरीक्षण करून ४-५ लोकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच ठाणे जिल्ह्यांतील एकूण १४५५ योजनांपैकी ६९९ योजना अंतिम करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी १९५ योजना पूर्ण करण्यात आलेल्या असून ४०३ योजनामधून तात्पुरत्या स्वरुपात पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. उर्वरित १०१ योजना सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत व ४४ योजना रद्द करण्यात आल्या आहेत. पाणी पुरवठ्याच्या १३ योजनांमध्ये झालेल्या अपहाराबाबत मुरबाड तालुक्यातील पाच गावे, वाडा तालुक्यातील तीन गावे, शहापूर तालुक्यातील दोन गावे व विक्रमगड तालुक्यातील तीन गावे अशा एकूण १३ गावातील समितींच्या पदाधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले असून ब-याच प्रकरणातील कामे आता सुरु झाली आहेत. ४९ प्रकरणांमध्ये पाणीपुरवठा योजनाची कामे अडचणीची ठरली होती. त्यामध्ये दोषी व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करून अपहारित केलेल्या रकमेची चौकशी करण्यात यावी व केलेल्या चौकशीच्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच ठाणे जिल्ह्यातील प्रगतीपथावर असलेल्या २५३ पाणीपुरवठा योजनांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी व कामे पूर्ण झाल्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## (४) आदिवासी विभागातंर्गत बांधण्यात येणा-या घरकुलांसाठी स्वतंत्र बांधकाम यंत्रणा निर्माण करणे :-

अनुसूचित जमाती कल्याण समितीने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील कामांना भेट दिली असता आदिवासी जमातीच्या लोकांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुलांची कामे बाहेरच्या संस्थेला देण्यापेक्षा ती स्थानिक संस्थेला देण्यात यावीत. प्रकल्प अधिकारी, ग्रामसेवक आणि लाभार्थी यांच्या एकत्रित बँक खात्यावर अनुदान दिले गेले तर कामे चांगल्याप्रकारे होतील. स्थानिक संस्थांमार्फत घरकुलांची कामे चांगल्याप्रकारे करून घेता येतील. कामामध्ये अनियमितता होणार नाही. लाभार्थ्यांना त्यांच्या मनाप्रमाणे आणि लवकरात लवकर घरकुले बांधून देता येतील. तसेच लाभार्थ्याला शासनातर्फे जे काही अनुदान दिले जाते. उदा. लाभार्थ्याला ७० हजार रुपये अनुदान देय असेल तर तेवढे अनुदान त्याला दिले जाते. मग तो लाभार्थी ७० हजार रुपये मध्ये घरकुल उभारतो किंवा २ लाख रुपयापर्यंत देखील खर्च करतो. घरकुलासाठी देय अनुदानापेक्षा किती जादा रक्कम खर्च करावयाची हे लाभार्थी ठरवतो. घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्याला मोठे घर बांधण्यास परवानगी द्यावी व घराचे मूल्यांकन करून त्याला देय असलेले पैसे दिले जावेत. इंदिरा आवास योजनेतंर्गत जी घरकुले बांधली जातात त्यांची जिल्हा परिषदेच्या संबंधित यंत्रणेच्या अभियंत्याकडून तपासणी केली जाते व बांधकामाच्या टप्प्यानुसार लाभार्थ्यांना पैसे दिले जातात. आदिवासी विकास विभागात घरकुल योजनेतंर्गत अभियंत्याची व्यवस्था केलेली नाही. लाभार्थी स्वतः घर बांधत असताना त्याला शासनाच्या वतीने अभियंत्याचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले तर त्याच्या घराचे बांधकाम चांगल्या प्रकारे होईल. आदिवासी विभागातंर्गत घरकुलांच्या बांधकामासाठी शासनाची स्वतंत्र तांत्रिक यंत्रणा असली पाहिजे अशी सूचना समितीने केली.

**अभिप्राय व शिफारशी -**

**आदिवासी जमातीच्या लोकांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुलाबाबत लाभार्थ्याला शासनातर्फे जे काही अनुदान दिले जाते. त्यामध्ये घरकुलासाठी देय अनुदानापेक्षा किती जादा रक्कम खर्च करावयाची हे लाभार्थी ठरवतो. घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्याला मोठे घर बांधावयाचे असल्यास घराचे मूल्यांकन करून त्याला देय असलेले पैसे दिले जावेत. इंदिरा आवास योजनेंतर्गत जी घरकुले बांधली जातात त्यांची जिल्हा परिषदेच्या संबंधित यंत्रणेच्या अभियंत्याकडून तपासणी केली जाते व बांधकामाच्या टप्प्यानुसार लाभार्थ्यांना पैसे दिले जातात. आदिवासी विकास विभागात घरकुल योजनेअंतर्गत बांधकाम अभियंत्याची व्यवस्था केलेली नाही. लाभार्थी स्वत: घर बांधत असताना त्याला शासनाच्या वतीने अभियंत्याचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले तर त्याच्या घराचे बांधकाम चांगल्या प्रकारे होईल. आदिवासी विभागातंर्गत घरकुलांच्या बांधकामासाठी शासनाने स्वतंत्र तांत्रिक बांधकाम यंत्रणा निर्माण केल्यास आदिवासी भागातील लाभार्थ्याच्या घराचे बांधकाम चांगल्या प्रकारे होईल त्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



## (५) आदिवासी भागात शौचालये बांधण्याची कारवाई करणे :-

शौचालये बांधताना ५० टक्के रक्कम घेतल्याशिवाय निधी देऊ नये असे शासनाचे आदेश आहेत. हागणदारीमुक्ती कार्यक्रम तसेच संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान यासारख्या चांगल्या योजना ग्रामविकास विभागाने राज्यात सुरु केल्या आहेत. हागणदारी मुक्तीच्या अटीमुळे विहिरी व पाणीपुरवठा योजनांची कामे अंतिम होऊ शकत नाहीत. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमातंर्गत हाती घेण्यात आलेल्या योजनांसाठी निधीचा प्रथम हप्ता देतांना गाव/पाडा ६० टक्के हागणदारीमुक्त असणेबाबत शासन निर्णयान्वये बंधनकारक केले आहे. परंतु निधीचा दुसरा हप्ता मुक्त करतांना गाव १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट असल्याने घेण्यात आलेल्या योजना अंतिम होऊ शकल्या नाहीत. आदिवासी जिल्ह्यात गाव/पाड्यात पिण्याच्या पाण्याची प्राथमिक सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याने त्यासाठी हागणदारी मुक्तीची अट शिथील करण्याची मागणी मा.मंत्री, पाणीपुरवठा विभाग यांना करण्यात आलेली होती. तथापि, विहीरींची व पाणीपुरवठ्याची कामे देण्यासंदर्भात जोपर्यंत गाव हागणदारी मुक्त होत नाही तोपर्यंत पैसे द्यायचे नाहीत अशी अट आहे. पाणीपुरवठा विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व अधिकार सरपंचांना दिले आहेत, त्यामुळेच नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या नाहीत, सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर नियंत्रणाचे अधिकार देखील नाहीत. ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी भाग आहे. दुस-या जिल्ह्यात कमी प्रमाणात आदिवासी लोक असतील, आपण एका बाजूला म्हणतो की, शौचालय स्वच्छ असले पाहिजे. आपण शौचालय जबरदस्तीने बांधायला लावतो, पण आदिवासी लोक ते वापरत नाहीत. शौचासाठी शौचालयाचा वापर केला पाहिजे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद सदस्यांना देखील निवडणुकीमध्ये या संदर्भात बंधन घातले आहे.

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी शौचालयाशिवाय घरकुलाचे बांधकाम अपूर्ण समजले जाते. आदिवासी भागात घरामध्ये शौचालय बांधले जात नाही. शौचासाठी ते जंगलात जातात. शासन निर्णयामध्ये एक बैठकीची खोली, एक स्वयंपाक घर, शौचालय व स्नानघर या गोष्टी अंतर्भूत आहेत. टोटल सॅनिटेशनच्या दृष्टीने शौचालय असणे महत्त्वाचे आहे असे समितीला सांगितले, गावामध्ये पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी गाव हागणदारीमुक्त करणे आवश्यक आहे. आदिवासी भागामध्ये २००-२००, ५००-५०० मीटरवर घरे असतात. आदिवासी गावे हागणदारीमुक्त झाली नाहीत तर त्या गावांसाठी पाणीपुरवठा योजना राबविल्या जाणार नाहीत आणि ती गावे पाण्यापासून वंचित राहतील असे मत समितीने व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी -**

**हागणदारीमुक्ती कार्यक्रम तसेच संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान यासारख्या चांगल्या योजना ग्रामविकास विभागाने राज्यात सुरू केल्या आहेत. हागणदारीमुक्तीच्या अटीमुळे विहिरी व पाणीपुरवठा योजनांची कामे अंतिम होऊ शकली नाहीत. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमातंर्गत हाती घेण्यात आलेल्या योजनांसाठी**

**निधीचा प्रथम हप्ता देतांना गाव/पाडा ६० टक्के हागणदारीमक्त असणेबाबत शासन निर्णयान्वये बंधनकारक आहे. परंतु निधीचा दुसरा हप्ता देतांना गाव १००टक्के हागणदारी मुक्तीची अट असल्याने घेण्यात आलेल्या योजना अंतिम होऊ शकल्या नाहीत. तसेच शौचालय बांधतांना ५० टक्के रक्कम घेतल्याशिवाय निधी वितरीत करू नये, असे शासनाचे आदेश आहेत. जोपर्यंत गाव हागणदारीमुक्त होत नाही, तोपर्यंत पैसे द्यायचे नाहीत असा पाणीपुरवठा विभागाचा शासन निर्णय आहे. त्यामुळे राज्यात नळ पाणीपुरवठा विभागाच्या योजना अपूर्ण आहेत. ठाणे जिल्हा परिषदेकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध असल्याने आदिवासी भागात शौचालये बांधण्याची कारवाई तातडीने सुरु करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०११ या कालावधीत ठाणे जिल्ह्याच्या भेटीत दिनांक १४ जानेवारी २०११ रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्ग यांच्या जातपडताळणी प्रमाणपत्रांच्या संदर्भात माहिती देताना समितीला सांगितले की, जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेले सन १९९५ पूर्वीचे २३ आणि सन १९९५ नंतरचे १२ कर्मचारी आहेत. सन १९९५ पूर्वीच्या कर्मचा-यांना फॉर्म भरून जात पडताळणीसाठी जी कागदपत्रे लागतात ती देण्याबाबत सन २००३ पासून वारंवार कळविले आहे. श्री. जी. सी. ठाकूर यांचे प्रकरण नाशिक विभागाकडे पाठविले आहे. प्रमाणपत्र न मिळाल्याने श्री. ठाकूर यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन दाखल केले आहे. न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे पुढे कार्यवाही झाली नाही. कार्यालयातील ज्या कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, त्यांनी एक महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्या सर्व कर्मचा-यांना काढून टाकण्यात येईल अशी नोटीस दिलेली आहे. दिनांक २९ जानेवारीपर्यंत मुदत दिलेली असून त्या तारखेच्या आत त्यांनी प्रमाणपत्र सादर केले नाही तर जे सन १९९५ पूर्वीचे आहेत त्यांना पदावनत केले जाईल आणि सन १९९५ नंतरच्या अधिकारी/कर्मचारी यांची सेवा समाप्त केली जाईल. श्रीमती करूणा कोळी यांची ज्यावेळी नेमणूक केली होती त्यावेळी त्यांच्याकडे दाखला होता. परंतु जात पडताळणी करण्याच्या अगोदर त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचा दाखला दिल्यामुळे त्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

दिनांक १२ सप्टेंबर २०१३ रोजी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. तथापि, सदर बैठकीत समितीला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या जात पडताळणी प्रकरणी जिल्हाधिकारी यांचेकडून कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती देण्यात आली नाही.

तथापि, सदर बैठकीत ठाणे जिल्ह्याच्या जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती देताना सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांनी समितीला सांगितले की, माहे नोव्हेंबर २०१० अखेरपर्यंत ३१४३ प्रकरणे प्रलंबित होती. माहे ऑगस्ट २०१३ अखेरपर्यंत २४४० प्रकरणे प्रलंबित आहेत. समितीच्या दौ-यानंतर महानगरपालिका, ठाणे/जिल्हाधिकारी, ठाणे/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ठाणे/पोलीस ग्रामीण, ठाणे/पोलिस शहर, ठाणे व जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयाकडील प्रलंबित प्रकरणांचा समितीकडून आढावा घेण्यात आला. त्यावेळी ८६ प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ५० प्रकरणे वैध होती व ११ प्रकरणे अवैध होती. ठाणे महानगरपालिकेची ६ ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाचे १, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे १, पोलिस ग्रामीण विभागाचे १, पोलीस शहर विभागाची ३, आणि ठाणे जिल्हा परिषदेची १३ अशी एकूण २५ प्रकरणे प्रलंबित होती. ही सर्व निकाली काढण्यात येत आहेत.



**अभिप्राय व शिफारशी -**

**जिल्हाधिकारी कार्यालयात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेले सन १९९५ पूर्वीचे २३ व सन १९९५ नंतरचे १२ कर्मचारी होते. सदर ३५ कर्मचा-यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक २९ जानेवारी, २०११ पर्यंतची मुदत दिलेली होती. सदर मुदतीत सन १९९५ पूर्वीच्या ज्या कर्मचा-यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही त्या कर्मचा-यांना पदावन्नत करण्याची व सन १९९५ च्या नंतरच्या कर्मचा-यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही केली जाईल असे जिल्हाधिकारी यांनी समितीला आश्वासित केले होते. अतः उपरोक्त ३५ कर्मचा-यांपैकी (सन १९९५ पूर्वीच्या व नंतरच्या) किती कर्मचा-यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केली आहेत. ज्या कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. अशा कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली आहे याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(६) जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या कुळवहिवाटी जमिनी संदर्भातील प्रकरणे :-**

दिनांक १२ जानेवारी २०११ रोजी जिल्हा परिषद कार्यालय ठाणे येथे झालेल्या बैठकीत ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या कुळवहिवाटीच्या संदर्भात देखील समितीने चर्चा केली. आदिवासींच्या जमिनीचे प्रत्यार्पण अधिनियम, १९७४ व महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ मधील करण्यात आलेल्या सुधारणेनुसार आदिवासींची जमीन जिल्हाधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय खरेदी-विक्री करणे, गहाण ठेवणे किंवा अन्य जनजाती व्यक्तींना देता येत नाही. अशाप्रकारे करण्यात आलेला कोणताही व्यवहार बेकायदेशीर असून जिल्हाधिका-यांकडे याबाबत तक्रार आल्यास स्वाधिकारी म्हणून तो व्यवहार रद्द करण्याचे जिल्हाधिका-यांना अधिकार आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये दिनांक ६ जुलै २००४ पासून आतापर्यंत जिल्हाधिका-यांच्या परवानगीने किती आदिवासींच्या जमीनींचे व्यवहार झाले आहेत आणि किती व्यवहार पूर्व परवानगीशिवाय झाले नाहीत. पूर्व परवानगीशिवाय झालेल्या किती व्यवहारामध्ये स्वाधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांनी कारवाई केली आहे. आतापर्यंत झालेल्या सर्व बेकायदा व्यवहारामध्ये किती

दिवसात कारवाई करण्यात येणार आहे? अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये ७ आदिवासी तालुके आहेत त्याबाबतचे सर्वाधिकार अपर जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे ८ शहरी तालुके आहेत. त्यामध्ये आदिवासी भाग असलेले शहापूर, मुरबाड, वसई, भिवंडीचा काही भाग आहे. या तालुक्यांमध्ये ७ केसेस झाल्या असून त्या पूर्व परवानगीने झाल्या आहेत. पूर्व परवानगीशिवाय एकही केस झालेली नाही. तीन आठवड्यापूर्वी वसई भागामध्ये आदिवासींच्या जमिनीवर गोडाऊन बांधण्यात आले होते, त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी घेऊन ते भूईसपाट करण्यात आले. त्याचप्रमाणे शासनाची परवानगी न घेता त्यांनी आपसात बसून व्यवहार केला असला तरी तो कायद्याच्या कक्षेमध्ये बसत नाही, अशी तक्रार प्राप्त झाल्यानंतर ते बांधकाम पाडून टाकण्यात आले असे समितीला सांगितले.

जिल्हाधिकारी यांनी स्वाधिकार वापरुन ती जमीन आदिवासींच्या ताब्यात दिली आहे काय. काही लोक परस्पर जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार करतात. जिल्हाधिका-यांची पूर्व परवानगी घेत नाहीत, केलेल्या व्यवहाराची नोंदणी करीत नाहीत. अशा लोकांवर कारवाई झाली पाहिजे. तहसिलदार आणि तलाठ्यांच्या पातळीवर जमिनीचे फेरफार करण्याचे व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर होतात. आदिवासींच्या जमिनींच्या बाबतीत असे प्रकार होतात काय, अशी समितीने पुन्हा विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी फिजीकली ती जमीन दुस-या व्यक्तीकडे होती त्यामुळे तेथील बांधकाम टाकून ती जमीन मूळ आदिवासी मालकाच्या ताब्यात दिली. वसई तालुक्यामध्ये आदिवासींच्या जमिनीमध्ये फेरफार झाल्याचे प्रकरण घडले होते. त्याबाबतच्या कागदपत्रांची तपासणी केली असता ती बोगस असल्याचे आढळले. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये संबंधित सर्कल इन्स्पेक्टर आणि तलाठ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आणि फेरफार रद्द करून संबंधित कर्मचा-यांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे असे समितीला सांगितले.

आदिवासी विभागामध्ये सर्रासपणे ९९ वर्षांचे करार केले जातात. हा व्यवहार करताना आदिवासींना फसविले जाते. याबाबतीत महसूल विभागाचे अधिकारी वा तहसिलदार चौकशी न करता त्या जमिनीला अकृषिक जमीन (N.A.) करून टाकतात. डहाणू आणि तलासरी तालुक्यांमध्ये आदिवासींची भातशेती असतानासुध्दा त्या जमिनी एन.ए. करण्यात आलेल्या आहेत. जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ मध्ये ५ वर्षांपेक्षा अधिक नसणा-या कालावधीसाठी भाडेपट्टयाने किंवा गहाण दिलेल्या जमिनींच्या बाबतीत जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय आदिवासींची जमीन जनजाती किंवा जनजातीतर व्यक्तींच्या नावाने हस्तांतरित केली जाणार नाही असे म्हटले आहे. या संदर्भात स्वाधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांना वाटले तर ते डायरेक्ट कारवाई करू शकतात. ९९ वर्षांच्या करारावर संपूर्ण तलासरी उभी राहिली आहे. त्याठिकाणी तहसिलदार व तलाठ्यांना हाताशी धरून जमीनींचे व्यवहार करण्यात आले आहेत. जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ (क) अन्वये ७/१२ च्या उता-यावर आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणास बंदी अशी नोंद घेण्यात आली आहे काय, अशी समितीने पृच्छा केली असता, जिल्हाधिकारी यांनी क्वॅासी ज्युडिशिअल आदेश देण्यात आले आहेत ते आदिवासीच्या हिताविरुध्द असतील तर ते तपासून घेण्यात येईल, असे समितीला सांगितले.



**दिनांक १५ जानेवारी, २०११ रोजी झालेल्या आढावा बैठकीच्या वेळी समिती सदस्यांना काही निवेदने प्राप्त झाली त्यातील एका निवेदनानुसार श्री. दत्तु रामचंद्र माळी हे मल्हार कोळी जातीचे असून त्यांची जमीन वाळीव, तहसिल वसई येथील सर्व्हे नंबर ३२/१ मध्ये होती. स्वतः ते सरपंच आहेत. श्री. दत्तु रामचंद्र माळी यांच्याकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र आहे. आदिवासी जमीन प्रत्यार्पण कायदा, १९७४ नुसार आदिवासीची जमीन बिगर आदिवासींना विकताच येत नाही. तरीही औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषीक परवानगी कशाच्या आधारे देण्यात आली दिनांक २१ ऑगस्ट १९९७ चे जातीचे प्रमाणपत्र व दिनांक ९ नोव्हेंबर, १९९७ चे वैधता प्रमाणपत्र असतांनाही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ व ३६ अ अन्वये सात बारावर आदिवासी असे लिहिलेले असतांनाही कोणाच्या तरी अर्जान्वये त्यांचे नाव कसे काय कमी करण्यात आले, निव्वळ आदिवासीची जमीन हडप करण्याच्या दृष्टीने अधिका-यांनी संगनमत करून हा प्रकार केलेला आहे यास कोण जबाबदार आहे, या प्रकरणाची जिल्हाधिका-यांनी चौकशी करावी व वस्तुनिष्ठ अहवाल समितीला तातडीने सादर करण्याचे निदेश समितीने दिले.**

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी श्री.दत्तु रामचंद्र माळी, रा. वालीव ता. वसई हे मल्हार कोळी (अ.ज.) समाजाचे असतांना मौजे-वालीव स.नं.३२/१ या जमीनीस औद्योगिक प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी कोणत्या आधारे देण्यात आली. तसेच सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३६, ३६अ ला पात्र असतांना ७/१२ वरील आदिवासीचे नाव कसे कमी करण्यात आले. या प्रकरणी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत महसूल विभागाकडून पुढीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती देण्यात आली.

"मौजे वालीव तालुका वसई व जिल्हा ठाणे येथील स.नं.३२ पै क्षेत्र ४-२९-० (ए.गुं.) पो.ख ०/१७-० एकूण क्षेत्र ५ एकर ६ गुंठे व स.नं.२० क्षेत्र ०-०७-० (ए.गुं.) स.नं. ३१ क्षेत्र ०-३६-० (ए.गुं) पो.ख. ०-०१-० एकूण ०-०१-० एकूण क्षेत्र ०-३७-० ही जमीन कब्जेदार सदरी काजी बहाउद्दीन काजी इब्राहीम यांचे नावे दाखल होती व इतर हक्क सदरी सामान्य कुळ म्हणून चांगो राघो माळी यांचे नाव स.नं.३२ ला फे.क्र.२०९ ने दाखल झाले होते. तद्‌नंतर फे.क्र.४२० ने गोपाळ पांगळ्या (ए.कू.पु.) व हि-या पांगळ्या यांची नावे सामान्य कुळ म्हणून दाखल झाली. स.नं.२० व ३१ या जमीनीला सामान्य कुळ म्हणून श्री.पांगळ्या राघो माळी यांचे नाव फे.क्र.२३६ अन्वये दाखल झाल्याचे दिसून येते. श्री.पांगळ्या राघो माळी मयत झाल्याने वारसाने गोपाळ पांगळ्या (ए.कु.पु.) यांचे नाव सामान्य कुळ म्हणून दाखल झाल्याचे दिसून येते. फे.क्र.४३७ पाहता स.नं.२०, ३१, ३२ या जमीनीचे एकूण क्षेत्रांपैकी १/२ क्षेत्राची हि-या पांगळ्या माळी यांचे नावे कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये विक्री झाल्याने वरील तीनही स.नं.च्या ७/१२ सदरी कु.का.कलम ४३ ला पात्र अशी नोंद ठेवण्यात आली. सदर जमीनीची ३२ ग अन्वये ठरविण्यात आलेली रक्कम कुळ श्री.हि-या पांगळ्या माळी व रामचंद्र पांगळ्या माळी यांनी संपूर्ण फेड केल्याने ३२ म सर्टीफिकेटवरून ७/१२ च्या इतर हक्कात असलेली टेनन्सी बोजाची नोंद फे.क्र.६४३ व ६४४ दिनांक २३ एप्रिल १९६६ अन्वये कमी करण्यात आली.

**सन १९५६-५७ नंतर विषयांकित जमिनीचे अभिलेखात झालेला बदलाबाबत फेरफारनिहाय तपशील अर्ज प्रपत्र "ब" मध्ये सादर करण्यात आला आहे.**

वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीच्या आधारे अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

**(१)** "श्री. दत्तू रामचंद्र माळी हे आदिवासी समाजाचे असून वसई तालुक्यातील वालीव गावात त्यांची नावे जमीन आहे. सदर जमीनीचा सर्व्हे क्रमांक ३२/१ आहे. या जमिनीच्या संदर्भात अकृषिक परवानगी कोणत्या कायद्यान्वये दिली, ७/१२ उता-यात कलम ३६ व ३६(अ) नमूद असताना त्यांचे नाव कसे काय कमी झाले आहे. उक्त शिक्का हा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील कलम ४४(अ) अन्वये देण्यात येतो. आदिवासींची जमीन असल्यास ७/१२ उता-यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन असल्यासंबंधीचा शिक्का असतो. अशा परिस्थितीत सदर जमीनीचे शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण किंवा विक्री होऊ शकत नाही. महाराष्ट्रात आदिवासींची जमीन रिस्टोअर करण्यासाठी असलेल्या कायद्याची सन १९७४ पासून सन २००४ पर्यंत मुदत होती. राज्य शासनाने सदर कायद्याला ३० वर्षांची मुदतवाढ दिली आहे. सदर कायदा आता सन २०३४ पर्यंत लागू राहणार आहे. या केसमध्ये सन १९५६-१९५७ पासून सदर जमीन कोणाकोणाच्या मालकीची होती व त्या दरम्यान झालेले सर्व व्यवहार त्याचप्रमाणे श्रीमती प्रेमाबाई हिरा माळी या आदिवासी महिलेचे नाव कसे कमी करण्यात आले, यासंदर्भात विभागाने अहवाल सादर केला असता याप्रकरणी चुकीच्या पध्दतीने व्यवहार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले. या व्यवहारात शासनाची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता होती. परंतु ती घेण्यात आलेली नाही, श्रीमती प्रेमाबाई माळी या महिलेने तहसीलदाराकडे अर्ज सादर केला होता की, ७/१२ उता-यामधील मारलेला शिक्का कमी करावा, त्यानुसार तहसीलदाराने आदेश पारित केले होते. त्यानंतर ही बाब प्रांत अधिका-यांच्या निदर्शनास आल्यानंतर याबाबतची पुन्हा तपासणी करण्यात आली. त्यावेळी सदर महिला आदिवासी असल्याचे आढळून आले. त्यानंतर दिनांक २७ मे २०१३ रोजी नव्याने आदेश पारित करून ती जमीन पुन्हा श्रीमती प्रेमाबाई माळी यांच्या नावे करण्यात आली. कायद्यानुसार अशा केसेसमध्ये सदर जमीन रिस्टोअर करून पुन्हा आदिवासींना द्यावी लागते. सदर जमीनीच्या संदर्भात सन १९५६-५७ पासून झालेले सर्व व्यवहार रद्द करावे लागतील. यासाठी सर्व अभिलेख्यांची तपासणी करावी लागणार आहे. या संबंधीची प्रक्रिया सुरू करण्यासाठी जिल्हाधिका-यांनी सूचना दिलेल्या आहेत. सदर जमीन आदिवासी महिलेची असल्यामुळे त्या महिलेचे ७/१२ उता-यावर पुन्हा नाव लावण्यात आलेले असून ती जमीनीची मालक झाली आहे.

सदर केसमध्ये समितीने अकृषिक परवानगी दिल्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत अकृषिक परवानगी कोणालाही दिली जाऊ शकते. आदिवासींची जमीन असल्यामुळे त्यासंबंधी अकृषिक परवानगी



देऊ नये असे कायद्यात कोठेही नमूद केलेले नाही. कायद्यानुसार अकृषिक परवानगी मागितल्यास ती दिली जाऊ शकते. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय बिगर आदिवासींना जमीन विकता येत नाही. सदर अट टाकण्याचा मुख्य उद्देश असा आहे की, जमिनीची विक्री करताना संबंधित जमीन मालक भूमिहीन होणार नाही. त्याचप्रमाणे जमीनीचा दिलेला मोबदला योग्य आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी लागते. यासाठी शासनाने स्टॅण्डर्ड फॉर्म तयार केलेला आहे. त्यानुषंगाने त्या क्षेत्रातील ५ वर्षांपासून झालेले जमीनींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार आणि रेडीरेकनरची किंमत यांची तुलना करून त्यापैकी जास्त असलेली किंमत आकारली जाते. अकृषिकची परवानगी ४० वर्षांपूर्वी १९७२ मध्ये देण्यात आली होती. परवानगी देत असताना काही गैरप्रकार झाला आहे का, सदर जमीन बिगर आदिवासीला विक्री करण्यात आली होती का, अशा अनेक बाबी आहेत, दिनांक २२ जानेवारी २००३ रोजी श्रीमती प्रेमाबाई माळी या महिलेने ७/१२ उता-यावर मी आदिवासी असल्यासंबंधी चुकीने नोंद झाली आहे व त्यासंबंधी शिक्का मारलेला आहे. तो शिक्का कमी करावा असा तहसिलदारांकडे अर्ज दिला होता. त्यानुसार ७/१२ उता-यावरील आदिवासी असल्यासंबंधीची नोंद कमी करण्यात आली. तसेच सदर अर्जासंबंधी पुन्हा खात्री करून घेतली जाईल. असे समितीला सांगितले.

समितीने जमीनीच्या ७/१२ उता-यावर कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन राहून तसेच ती महिला आदिवासी असल्याची लेखी नोंद झालेली आहे. अशा परिस्थितीत ७/१२ उता-यामधील नोंदीमध्ये कशाच्या आधारावर दुरुस्ती करण्यात आली अशी पुन्हा पृच्छा केली असता अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी सांगितले की, ७/१२ उतारा दुरुस्ती करणे योग्य नाही. यासंदर्भात चूक झालेली आहे. त्या जमीनीचा सर्व्हे क्रमांक ३२(१) व ३२(२) आहे. दिनांक ३० मे २००३ रोजी तत्कालीन तलाठी, वालीव यांच्या समक्ष याप्रकरणी जाब-जबाब नोंदविण्यात आले. ७/१२ उता-यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन राहून अशी नोंद आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम १५५ अन्वये तहसीलदार यांच्या न्यायालयात सदर प्रकरण सुरू करून महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ३६ व ३६(अ) आणि आदिवासीची नोंद कमी करण्यासंबंधी आदेश पारित करण्यात आले होते. सदर प्रकरण क्वॉसी ज्युडिशियल स्वरुपाचे असून या प्रकरणी सखोल चौकशी केली जाईल. हा निर्णय न पटणारा असा आहे. आदिवासींची जमीन बिगर आदिवासींना विक्री करावयाची असल्यास त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

जमीनीच्या ७/१२ उता-यामधील नोंद किंवा शिक्का रद्द करण्याचा अधिकार तहसीलदारांना नाही, या संबंधी जिल्हाधिकारी, आयुक्त किंवा शासनस्तरावर अधिकार आहेत.

एखाद्याने बिगर आदिवासीकडून जमीन विकत घेतल्यानंतर खरेदीखताची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सदर प्रकरण तलाठ्याकडे पाठविण्यात आले असता तलाठ्याने सदर व्यवहारासंबंधी ७/१२ वर जमीनीची नोंदणी करीत असताना कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन राहून नोंद केली आहे. परंतु आता तीच जमीन

विकायची असल्यास बिगर आदिवासीला विकता येणार नसल्याने ७/१२ उता-यामध्ये कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन राहून अशा प्रकारे केलेली नोंदणी वगळण्यास सांगितले असता संबंधित तलाठ्याने त्यास ७/१२ उता-यामधील नोंद वगळण्याचा अधिकार नसल्याचे आणि याबाबतची कार्यवाही करण्यासाठी सदर प्रकरण आयुक्त किंवा जिल्हाधिकारी स्तरावर पाठवावे लागेल असे सांगितले. ही बाब समितीने बैठकीच्या वेळी निदर्शनास आणून दिली असता, अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी या प्रकरणासंबंधीची माहिती घेऊन तहसिलदारांना जमीनीच्या ७/१२ उता-यामधील नोंदीमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे किंवा नाही तसेच तहसिलदारांना अशा प्रकारचे अधिकार असल्यास त्यात बदल करण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही केली जाईल. सदर जमीनीची विक्री किंवा हस्तांतरण शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय होऊ शकणार नाही, अशा प्रकारे ७/१२ उता-यावर उल्लेख असावा जेणेकरून तो सर्वसामान्य लोकांना समजू शकेल. तहसीलदारांना ७/१२ उता-यावर नोंद करण्याचा, शिक्का मारण्याचा अधिकार आहे, परंतु त्यातील नोंद कमी करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार आहे किंवा नाही, ही बाब तपासून घेण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी -**

**श्री. दत्तु रामचंद्र माळी, रा.वालीव ता.वसई हे आदिवासी समाजातील आहेत. त्यांना मौजे-वालीव येथील त्यांच्या नावे असलेला स.नं.३२/१ या जमीनीस औद्योगिक प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी देण्यात आली. सदर जमीन आदिवासींची असल्यास ७/१२ उता-यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम ३६ व ३६(अ) च्या अधीन असल्यासंबंधीचा शिक्का असतो. अशा परिस्थितीत सदर जमीनीचे शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण किंवा विक्री होऊ शकत नाही. तथापि, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सन १९६६ चे कलम ३६, ३६ अ ला पात्र असतांना ७/१२ वरील त्यांचे नाव कमी करण्यात आले आहे. आदिवासींची जमीन असल्यास त्याबाबत अकृषिक परवानगी देऊ नये असे कायद्यात कोठेही नमूद केलेले नाही. कायद्यानुसार अकृषिक परवानगी मागितल्यास ती दिली जाऊ शकते. परंतु शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय बिगर आदिवासींना जमीन विकता येत नाही. दिनांक २२ जानेवारी, २००३ रोजी श्रीमती प्रेमाबाई माळी या महिलेची ७/१२ उता-यावर आदिवासी असल्यासंबंधी चुकीने नोंद झाली आहे व त्याबाबतचा शिक्का सुध्दा मारलेला आहे. त्यामुळे ७/१२ उता-यावर माझी आदिवासी असल्यासंबंधीची नोंद व शिक्का कमी करावा असा श्रीमती माळी यांनी तहसिलदारांकडे अर्ज दिला होता. त्या अनुषंगाने ७/१२ मधील नोंद कमी करण्यात आली. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १५५ अन्वये या प्रकरणी तहसीलदार यांच्या न्यायालयात सदर प्रकरण सुरू असताना महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ३६ व ३६(अ) आणि आदिवासीची नोंद कमी करण्यासंबंधी आदेश पारित करण्यात आले होते. परंतु आदिवासींची जमीन बिगर आदिवासींना विक्री करावयाची असल्यास त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगीची आवश्यकता आहे. सदर निर्णय न पटणारा असा आहे त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**



**तसेच तहसिलदारांना जमीनीच्या ७/१२ उता-यावर नोंद करण्याचा, शिक्का मारण्याचा अधिकार आहे, जमीनीच्या ७/१२ उता-यामधील नोंद किंवा शिक्का रद्द वा वगळण्याचा अधिकार तहसीलदारांना नसुन यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकारी, आयुक्त किंवा शासन स्तरावर आहेत. तहसिलदारांना जमीनीच्या ७/१२ उता-यावर नोंद किंवा शिक्का रद्द करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार आहे किंवा नाही, ही बाब तपासून घेण्यात यावी व तहसिलदारांना अशाप्रकारचे अधिकार असल्यास त्यात बदल करण्यासाठी शासन स्तरावरून त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, अशी ही समितीची शिफारस आहे.**

**(२)** श्री. रामा कमळ्या साठवण या आदिवासी व्यक्तीची राजावली येथील सर्व्हे नंबर १५२ मधील २-४०-८ क्षेत्र जमीन आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यानुसार खरेदी होत नसतानाही बोगस कागदपत्रे बनवून ती हडप केल्याचे दिसून येते. तेव्हा याबाबतीत देखील जिल्हाधिका-यांनी चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. या प्रकरणाबाबत उप विभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांनी दिनांक ६ मार्च २०१० रोजीच्या पत्रात असे कळविले आहे की, मौजे राजावली, तालुका वसई येथील सर्व्हे नंबर १५२ क्षेत्र २-४०-८ या जागेबाबत अर्जात नमूद केलेला आदेश क्रमांक बीडी/कुव/विप/वसई/एसआर-२९८/२००८ अन्वये विक्री परवानगी या कार्यालयाकडून देण्यात आल्याचे दिसून येत नाही. असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

समितीला साक्षीच्यावेळी वरील प्रकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीची पुढीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती देण्यात आली.

"मौजे राजावली ता.वसई येथील स.नं.१५२ मधील क्षेत्र २-४०-८ हे. आर. या जमीनीचे बिगर आदिवासीधारकांनी बनावट व खोटी कागदपत्र/दस्तऐवज तयार करून परस्पररित्या हडप केल्याबाबत दिलेल्या तक्रार अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांवर चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक १० मार्च २०१० रोजीच्या पत्रान्वये आदेश दिले आहेत. सदरचा तक्रार अर्ज या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/कार्या-४/टे-१/टेनन्सी/१८७२१, दिनांक ३० मार्च, २०१० अन्वये, तहसिलदार वसई या कार्यालयाने चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत मंडळ अधिकारी, मांडवी यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून त्यांनी सादर केलेल्या अहवालाप्रमाणे व तक्रारी अर्जासोबतच्या उपलब्ध कागदपत्रावरून सदरची जमीन ही श्री. रामा कमळ्या साठवण यांचे वडील व त्यांचे कुटुंबियास सन १९९२ मध्ये कुळ कायदा कलम ३२ ग प्रमाणे विक्री होऊन मिळालेली आहे. त्यानंतर वारसाच्या नावाने देखील झाली आहे.

सदर जमीनीची विक्री परवानगी उप विभागीय अधिकारी विभाग, भिवंडी यांचे दिनांक २० डिसेंबर, २००८ च्या आदेशाअन्वये, श्री. नेपोलियन मर्यान लोपेस रा. गोखिवरे व श्री. समशेर रायफल खान रा.कुर्ला (प.) मुंबई यांचे नावे घेतल्याचे विक्री परवानगीचे पत्रावरून दिसून येते. तथापी सदरची विक्री त्यांचे कार्यालयाकडून देण्यात आलेली नसल्याचे उप विभागीय अधिकारी भिवंडी विभाग, भिवंडी यांनी

दिनांक ६ मार्च २०१० रोजी श्री. लक्ष्मण बी. नारळे यांना कळविलेल्या पत्रावरून दिसून येते. सदर जमिनीची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६, ३६ अ चे परवानगीचे आदेश जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील पत्र क्र.शा/कार्या-४/टे-१/टेनन्सी/एसआर. २३४, दिनांक ११ ऑगस्ट, २००८ अन्वये, निर्गमित केल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र असा आदेश या कार्यालयाकडूनही निर्गमित केलेला नाही असे श्री.नारळे यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१० चे पत्रान्वये, दिलेल्या उत्तरावरुन दिसून येते. यावरून सदरची विक्री परवानगी ही बनावट व बोगस असल्याचे दिसून येत आहे. सदर जमीनीबाबत मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे स्तरावरून शासनास प्रस्ताव सादर केला नसल्याचे श्री.लक्ष्मण बिस्तुर नारळे यांना, दिनांक २ मार्च, २०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर जमीनीचे विक्री परवानगीबाबत मंडळ अधिकारी, मांडवी यांचेकडून अथवा आयुक्त, कोकण विभाग कार्यालयाकडून कोणताही प्रस्ताव सादर केला नसल्याचे दिसून येते. म्हणजेच सदर जमीनीचे विक्रीबाबतचे सर्व आदेश बनावट व बोगस असल्याचे दिसून येते. सदर जमीनीचे बनावट कागदपत्र तयार करणा-या संबंधित खरेदीदार (१) श्री.नेपोलियन मर्यान लोपेस (२) समशेर खान यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत संबंधित मंडळ अधिकारी मांडवी यांना प्राधिकृत केले असून, त्यांचेमार्फत दिनांक ६ एप्रिल २०१० रोजी एफ.आय.आर.क्र.१०० अन्वये, कलम ४६७, ४६८, ४७१, ४७२, ४१९, ४२० खाली गुन्हा दाखल करणेत आला आहे. तसेच याप्रकरणी जबाबदार असलेले तत्कालीन मंडळ अधिकारी यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०११ च्या आदेशाअन्वये, अन्य प्रकरणी निलंबीत करण्यात आले आहे.

वरील माहितीच्या आधारे अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांनी सांगितले की, श्री. रामा साठवण, वसई तालुक्यात राजावली येथे राहत असून ते आदिवासी समाजाचे आहेत. त्यांच्या जमीनीचा सर्व्हे क्रमांक १५२ मधील क्षेत्र २.४० हे.आर. जमीनीचे बिगर आदिवासी धारकानी बोगस कागदपत्रे तयार करून ती जमीन हडप करण्यात आली. याप्रकरणी समितीकडे प्राप्त झालेली तक्रार खरी असून विभागाकडून तपासणी केली असता त्यात असे आढळून आले की, श्री.नेपोलियन मर्यान लोपेस, राहणार गोखिवरे व श्री. समसेर रायफल खान, राहणार कुर्ला यांनी बोगस कागदपत्रे तयार करून सदर जमीन हडप केली होती. याप्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाकडून आदेश निर्गमित झाल्याचे दर्शविण्यात आले होते. परंतु ही वस्तुस्थिती नाही. जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाकडून सदर आदेश निर्गमित करण्यात आले नव्हते. जमीन मिळकतीच्या ७/१२ उता-यावर श्री.साठवण यांचे नाव आहे. तसेच गाव अभिलेख्यात कोणताही बदल झालेला नाही. सदर जमीन दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी पासून त्यांच्या ताब्यात आहे. फौजदारी प्रकरणाची सविस्तर माहिती घेऊन ती नंतर समितीला सादर केली जाईल.

सदर प्रकरणी दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणाची सद्य:स्थिती ३ महिन्याच्या कालावधीत समितीकडे सादर करावी. तसेच फौजदारी गुन्ह्याचा वेगाने तपास करण्याबाबत विभागास कळविण्याचे निदेश समितीने दिले.



**अभिप्राय व शिफारशी -**

**मौजे राजावली ता. वसई येथील श्री. रामा कमळ्या साठवण आदिवासी समाजाचे आहेत. त्यांच्या जमीनीचा सर्व्हे नंबर १५२ क्षेत्र २.४०.८ असा आहे. आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यानुसार खरेदी होत नसताना या जमीनीचे बिगर आदिवासी धारकांनी म्हणजेच श्री. नेपोलियन मर्यान लोपेस, गोखिवरे व श्री. समसेर रायफल खान, कुर्ला यांनी बोगस कागदपत्रे बनवून ती जमीन हडप केली आहे. याप्रकरणी चौकशी केली असता जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाकडून याबाबत कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आले नव्हते. व जमीन मिळकतीच्या ७/१२ उता-यावर श्री.साठवण यांचे नाव असून गाव अभिलेख्यात कोणताही बदल झालेला नाही. तथापि या जमीनीचे बिगर आदिवासी धारकांनी बनावट व खोटी कागदपत्र/ दस्तऐवज तयार करून परस्पररित्या हडप केल्याबाबत दिलेल्या तक्रार अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांवर जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा ,अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच श्री. नेपोलियन मर्यन लोपेस व श्री.समसेर खान यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणासंदर्भात विभागाकडून तात्काळ तपासणी करून तपासणीअंती केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(३)** श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी रा. कासणे तालुका भिवंडी यांच्या जमीनीचा सर्व्हे नंबर २१६ मध्ये २४९०० चौरस मीटर जागेमध्ये त्यांना सेवा उद्योगासाठी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००६ रोजीच्या आदेशान्वये अकृषिक परवाना दिलेला आहे. दिनांक ७ जून १९९५ रोजीच्या परवानगीने आदिवासी हस्तांतरण झालेले आहे आणि जागेमध्ये शेतीचा वापर सुरू आहे. अशी जिल्हाधिकारी यांच्या समवेत झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला माहिती देण्यात आली.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या विभागीय साक्षीच्यावेळी श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी यांचे नावे मौजे-कासणे, ता.भिवंडी येथील स.नं. २१६ क्षेत्र २४९०० चौ.मी. जागेमध्ये सेवा उद्योगासाठी अकृषिक परवानगी देण्यात आली आहे. या जमीनीच्या संदर्भात दिनांक ७ जून, १९९५ रोजी आदिवासी ते आदिवासी हस्तांतरण झालेले आहे व बिनशेती वापर सुरू आहे. याबाबत लेखी स्वरुपात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

मौजे कासणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जमीन स नं. २१६ क्षेत्र २४९०० चौ.मी. या क्षेत्राची सेवा उद्योग या प्रयोजनार्थ श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी व इतर यांचे कुळमुखत्यारी श्री. पांडुरंग शिवराम खाडे यांना सर्व संबंधित विभागाचे अभिप्राय ना हरकत दाखला प्राप्त करून या कार्यालयाचे दिनांक ८ मार्च, २००६ च्या आदेशान्वये अकृषिक परवानगी देण्यात आली आहे. सदरच्या अकृषिक परवानगीच्या

आदेशातील अट क्र. १५ अ मध्ये प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसुल संहितेतील कलम ३६अ च्या तरतुदी बिनशेती झाल्यानंतरही जमिनधारक आदिवासी असल्यामुळे लागू राहणार आहेत. तेव्हा रेखांकनातील कोणताही भूखंड किंवा त्याचा कोणताही भाग शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार भिवंडी यांचेकडून अहवाल मागविणेत आला असता त्यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०११ अन्वये कळविले आहे की, "मौजे कासणे, ता. भिवंडी येथील वरील जमिनीपैंकी ८००० चौ.मी. जमीन श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी व इतर यांचेकडे, श्री. मुरलीधर महादु पिचड व श्रीमती चंद्रभागा मुरलीधर पिचड यांचेकडे ८००० चौ.मी. व कुमार स्वप्नील मुरलीधर पिचड यांचेकडे ८९०० चौ.मी. क्षेत्र विक्री परवानगी न घेता खरेदीखताने हस्तांतरण झाल्याचे कळविले आहे व त्याबाबत फेरफार क्र. ११५४, दिनांक २९ नोव्हेंबर, २००६ अन्वये नोंद झालेली आहे. सदर जमीनी पूर्वी कुळ कायदा कलम ४३ ला पात्र होती. श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी यांची जमीनीच्या ७/१२ वरील असलेली कुळ कायदा कलम ४३ ची नोंद कमी करणेत आलेली असून सदर शर्त शिथील करून त्यांनी विक्री परवानगी घेतलेली आहे. मात्र सदरची जमीन जमीन महसुल संहितेच्या कलम ३६ व ३६अ ला अधीन असल्यामुळे सदर जमीनीचे फे.क्र. ११५४ दिनांक २९ नोव्हेंबर, २००३ अन्वये आदिवासी व्यक्तीकडून आदिवासी व्यक्तीकडे जमीनीचे हस्तांतरण करते वेळी परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु विक्री परवानगी न घेतल्यामुळे जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ चा भंग झाल्याचे दिसून येत आहे. तसेच जमीनीवर अनधिकृतरित्या हॉटेलचे बांधकाम केलेले असल्यामुळे दिनांक ८ मार्च, २००६ च्या बिनशेती आदेशातील शर्ती व अटींचे उल्लंघन केल्यामुळे या प्रकरणी शर्तभंग झाल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी जमीन महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम ३६ व ३६अ ला अधिन असल्याने हस्तांतरणाची पूर्व परवानगी न घेता फेरफार क्र. ११५४ अन्वये जमीनीचे हस्तांतरण झाले आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांनी सदर फेरफार पुर्नविलोकन हस्तांतरणापुर्वी सक्षम अधिकारी यांची पूर्व परवानगी न घेतल्याने फेरफार क्र. ११५४ रद्द करून मूळ मालकांची नावे दाखल करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.

वरील माहितीच्या आधारे साक्षीच्या वेळी अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांनी माहिती देताना सांगितले की, सदर जमीन श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी यांची असून त्यांनी सुरवातीला अकृषिकची परवानगी मागितली होती. परंतु जमीन अकृषिक झाल्यानंतर ती हस्तांतरित करण्यात आली. जमीन हस्तांतरित करताना शासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नाही. शासनाची पूर्व परवानगी न घेता जमीनीचे हस्तांतरण करण्यात आले. सदर व्यवहार गैरकायदेशीर झालेला असल्यामुळे हा व्यवहार रद्द करण्यात आला असून श्री.काळुराम हेंद्र्या कातकरी यांचे नाव पुन्हा समाविष्ट करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी विभागीय अधिका-यांकडे अपील प्रलंबित आहे.





समितीने या प्रकरणामध्ये ३/४ वर्षे जमीनीचा वापर करण्यात आलेला आहे. सदर जमीन अकृषिक झालेली आहे. आता ही जमीन आदिवासीला देत असताना ती जमीन अकृषिकच राहणार आहे काय, तसेच या जमीनीवर हॉटेलसह ही जमीन मूळ मालकाला दिली जाईल काय, अशी पृच्छा केली असता अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी आदिवासीला सदर जमीन अकृषिक नको असेल तर ती जमीन अकृषीक राहणार नाही आदिवासीने एन.ए रद्द करण्याच्या संदर्भात अर्ज दिला तर सदर जमीनीची एनएची मान्यता रद्द होऊ शकते. सदर जमीनीची खरेदी विक्री दोन आदिवासींमध्ये झालेली आहे. जिल्हाधिका-यांची परवानगी न घेता हा व्यवहार झालेला असल्यामुळे तो बेकायदेशीर झालेला आहे. शासनाकडे जमीन आल्यानंतर शासन ती जमीन मूळ आदिवासीला परत करीत असते. या प्रकरणामध्ये अपील करण्यात आलेले आहे. असे समितीला विषद केले. नोंदणी करण्याचे काम तलाठी करतो. नोंदणीसाठी तहसीलदारांना जिल्हाधिका-यांचे आदेश लागत असतात. या प्रकरणामध्ये जिल्हाधिका-यांनी आदेश दिलेले नसतांना तहसीलदाराने आदेश कसे काय दिले, या प्रकरणामध्ये जी फेरफार झालेली आहे ती बेकायदेशीर आहे. तहसीलदाराने अशा प्रकारचे आदेश दिले असेल तर संबंधित तहसीलदारावर व संबंधितांवर जबाबदारी निश्चित कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी -**

**श्री.काळुराम हेंद्र्या कातकरी हा कासणे, तालुका भिवंडी येथे रहात आहे. त्यांच्या जमीनीचा सर्व्हे नंबर २१६, क्षेत्र २४९०० चौरस मीटर इतका असून या जागेमध्ये त्यांना सेवा उद्योगासाठी अकृषिक परवाना देण्यात आला आहे. सदर जमीन श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी यांची असून त्यांनी सुरवातीला अकृषिकची परवानगी मागितली होती. परंतु जमीन अकृषिक झाल्यानंतर ती हस्तांतरित करण्यात आली. जमीन हस्तांतरित करताना शासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नाही. शासनाची पूर्व परवानगी न घेता जमीनीचे दिनांक ७ जून, १९९५ रोजी आदिवासी ते आदिवासी हस्तांतरण झालेले आहे व त्याठिकाणी बिनशेती वापर सुरु आहे. सदर जमीन पूर्वी कुळ कायदा कलम ४३ ला पात्र असल्याने श्री. काळुराम हेंद्र्या कातकरी यांनी जमीनीच्या ७/१२ वरील असलेली कुळ कायदा कलम ४३ ची नोंद कमी करण्यात आलेली आहे. त्यावेळी सदर शर्त शिथील करून विक्री परवानगी देण्यात आली मात्र सदरची जमीन जमीन महसूल संहितेच्या कलम ३६ व ३६अ ला अधीन असल्यामुळे त्या जमीनीचे फे.क्र. ११५४ दिनांक २९ नोव्हेंबर, २००३ अन्वये आदिवासी व्यक्तीकडून आदिवासी व्यक्तीकडे जमीनीचे हस्तांतरण करते वेळी विक्री परवानगी घेणे आवश्यक होते, मात्र विक्री परवानगी न घेतल्यामुळे जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ चा भंग झालेला आहे. या प्रकरणामध्ये जो फेरफार झालेला आहे, तो बेकायदेशीर झालेला असून जिल्हाधिका-यांची परवानगी न घेता हा व्यवहार झालेला असल्यामुळे तो बेकायदेशीर झालेला आहे. शासनाकडे जमीन आल्यानंतर शासन ती जमीन मूळ आदिवासीला परत करीत असते. तसेच याप्रकरणी तहसीलदाराने आदेश कसे काय दिले**

**या प्रकरणामध्ये अपील करण्यात आलेले असून या प्रकरणामध्ये तहसिलदाराने अशाप्रकारचे आदेश दिले असतील तर तहसिलदार व संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(७) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाअंतर्गत कामांना दिलेल्या भेटी :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १३ व दिनांक १४ जानेवारी, २०११ रोजी ठाणे जिल्ह्यातील वसई, पालघर, वाडा, विक्रमगड, जव्हार, भिवंडी मोखाडा व शहापूर तालुक्यातील आश्रमशाळा तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या विविध कामांना भेट देऊन पाहणी केली.

**(१) शासकीय आश्रमशाळा, चिंबीपाडा :-**

सदर आश्रमशाळा इयत्ता १२ वीपर्यंत असून या आश्रमशाळेत ७४७ विद्यार्थी आहेत. या ठिकाणी मुलांच्या हॉस्टेलच्या इमारतीचे बांधकाम सुरु असून त्यामध्ये लायब्ररी, स्टाफ रुम, बाथरुम, शौचालयांची सोयी असणार आहे. समितीने प्रत्यक्षात बांधकामाची पाहणी केली त्यावेळी मटेरियलचा व बांधकामाचा दर्जा चांगला असल्याचे आढळले. समितीने जेवणाच्या दर्जाबाबत चौकशी केली असता मुलांची शारिरीक वाढ चांगल्या प्रकारे होण्यासाठी जेवणाबरोबर व्हिटॅमिनचे पाऊच दिले जात असल्याचे सांगण्यात आले. तसेच इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना स्वेटर मिळाले नसल्याचे व एकच गणवेश दिल्याचे सांगण्यात आले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी शासकीय आश्रम शाळेत आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

शासकीय आश्रमशाळा चिंबिपाडा येथे दिनांक १२ फेब्रुवारी, २०११ रोजी ६२२ नग स्वेटर पुरवठा करण्यात आला. त्यापैकी ३२३ नग दिनांक १३ फेब्रुवारी, २०११ रोजी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. उर्वरित २९९ नग स्वेटर सन २०११-१२ शैक्षणिक वर्षात वाटप करण्यांत आले. पहिला गणवेष ४०२ नग दिनांक १४ ऑगस्ट, २०१० रोजी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. दुस-या गणवेष संचाचे वाटप दिनांक २५ जानेवारी, २०११ रोजी करण्यात आले. इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी लिहिता वाचता यावे यासाठी इंग्रजी विषयाचे जादा तास घेऊन इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेऊन त्यांच्याकडून लिहिण्याचा सराव करून घेण्यांत आला. शालेय स्तरावर वाचन लेखन प्रकल्प राबविण्यात येत आहे. ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी लेखन व वाचन करता येत नाही अशा विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका घेऊन त्यांच्याकडून लिहिण्याचा सराव करून घेण्यांत आला आहे. मुलांना मोठी साईज लोकर सतरंजी १०





नग व लहान साईज लोकरच्या सतरंज्या ३६३ नग तसेच आसण पट्या ६९ नग पुरवठा करण्यांत आलेला आहे. शासनाने ठरवून दिलेल्या दिनचर्याप्रमाणे गोडतेल देण्यांत येते, मात्र भेटीच्या दिवशी सकाळी त्या दिवसाचे गोडतेल वापरण्यासाठी काढल्यामुळे गोडतेल रजिस्टरच्या नोंदीमध्ये कमी आढळले. संध्याकाळी साठा रजिस्टरमध्ये दिवसभरात जेवणासाठी वापरण्यांत आलेल्या अन्नधान्याच्या नोंदी घेतल्या जातात त्यामुळे गोडतेल साठा रजिस्टर मधील नोंदी पेक्षा कमी आढळून आले. परंतु प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही. गोडतेल रजिस्टर साठ्याप्रमाणे बरोबर आहे. एकूण ६ संगणक संचाचा पुरवठा करण्यांत आलेला असून विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान देण्यांत येत आहे व संगणकाचा वापर विद्यार्थी करीत आहेत.

**(२) स्व.धर्मवीर आनंद दिघे संस्थापित शिवनिकेतन ट्रस्ट संचालित भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली, ता.कल्याण :-**

समितीने या सैनिकी विद्यालयास भेट दिली असता तेथील अधिका-यांनी समितीला अशी माहिती दिली की, या विद्यालयात एकूण ४७० विद्यार्थी असून येथे इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग आहेत. एकूण कर्मचा-यांची संख्या ५० इतकी आहे. अनुसूचित जमातीचे ४ शिक्षक व दोन सेवानिवृत्त कर्मचारी येथे कार्यरत आहेत. या विद्यालयात जव्हार, डहाणू व शहापूर या तिन्ही प्रकल्पातून २५ ते ३० मुलांची यादी येते. या मुलांची लेखी परीक्षा घेऊन प्रत्येक प्रकल्पातून १५ मुलांची निवड करून ४५ विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश दिला जातो. या सैनिकी शाळेमध्ये दरवर्षी तिन्ही प्रकल्पातून आदिवासी विद्यार्थी पाठविले पाहिजेत, तिन्ही प्रकल्पातून किमान ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला पाहिजे आणि अनुदानात वाढ करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली, येथे आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात करण्यात आलेल्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खडवली प्रकल्प कार्यालय शहापूर कार्यालयाकडून या संस्थेला सन २००९-१० व २०१०-११ वर्षातील विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्ता व इतर खर्चाचे प्रदान धनादेश क्रमांक ४२५०३७ दिनांक ११ एप्रिल, २०११ रोजी रु.६,००,०००/- करण्यात आले. सैनिकी शाळेला जोडून मंजूर झालेल्या अतिरिक्त तुकडीवरील कर्मचा-यांचे वेतन व शिक्षक मानधनाचे प्रदान धनादेश क्रमांक ८२६२९३ दिनांक ०५ ऑगस्ट, २०११ रोजी ९६,०००/- करण्यात आले. सन २०१०-११ च्या निर्वाह भत्ताची ६०टक्के व ४० टक्के रक्कम रु.६,००,०००/- धनादेश क्रमांक ६६४१०४ दिनांक ८ डिसेंबर, २०११ रोजी करण्यात आली. सदर संस्थेस वाटप करावयाची कोणतेही रक्कम प्रलंबित अथवा शिल्लक नाही.

**(३) विशेष केंद्रीय सहाय्य योजना अंतर्गत घरकुल योजना, कातकरी, मळेगांव, ता.शहापूर :-**

समितीने सदरहू योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांबाबत समितीला अशी माहिती देण्यात आली की, सन २००८-०९ या वर्षातील हे काम आहे. याठिकाणी १० घरकुले बांधलेली आहेत. समितीने घरकुलांची प्रत्यक्षात पाहणी केली त्यावेळी घराच्या छप्परावर लोड वॉल टाकली नसल्याचे, शौचालयांचे काम अपूर्ण असल्याचे, भिंतींना प्लास्टर व रंग लावला नसल्याचे आढळून आले. काम अपूर्ण असताना सुध्दा लाभार्थ्यांना घरकुलांचा ताबा दिल्यामुळे ते तेथे रहात असल्याचे आढळले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी घरकुल योजना, कातकरी, मळेगांव, ता.शहापूर येथे आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

सदरहू योजनेअंतर्गत सन २००८-०९ मध्ये मंजूर झालेली घरकुल योजना ही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे या यंत्रणेकडे वर्ग करण्यात आलेली होती. गटविकास अधिकारी, शहापूर यांचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१२ च्या पत्रानुसार मळेगांव कातकरवाडी, ता. शहापूर, जि. ठाणे येथे विशेष केंद्रिय सहाय्य योजनेतंर्गत एकूण १० घरकुलांचा लाभधारकांना लाभ देण्यांत आलेला असून सर्व घरकुलांचे छप्परावर लोड वॉल बसविण्यांत आलेले आहेत. तसेच घरकुलांचे प्लास्टर व रंगरंगोटीच्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करण्यांत आलेला नसल्याने ती कामे करण्यांत आलेली नाहीत.

**(४) श्री. अण्णासाहेब धामणे, माध्यमिक आश्रमशाळा, कामण ता. वसई :-**

समितीने वसई तालुक्यातील कामण गावामधील श्री. अण्णासाहेब धामणे माध्यमिक आश्रमशाळेला भेट दिली. त्यावेळी शाळेतील इयत्ता दहावीमधील एकूण ६१ विद्यार्थ्यापैकी फक्त ९ विद्यार्थ्यांना १५ चा पाढा म्हणता आला. त्याचबरोबर इंग्रजी आणि गणित या विषयांमध्ये देखील विद्यार्थ्यांची प्रगती असमाधानकारक असल्याचे आढळून आले. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्याकडे अधिक लक्ष द्यावे असे समितीने निदेश दिले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी माध्यमिक आश्रम शाळेत आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

समितीने दिलेल्या निर्देशानुसार तज्ञ शिक्षक बोलावून व जादा तास घेऊन इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सदर शाळेचा इयता १० वी चा वार्षिक निकाल ९८.३३ टक्के इतका लागलेला आहे.

**(५) शासकीय आश्रमशाळा, तवा, ता.डहाणू :-**

समितीने सदर शासकीय आश्रमशाळेला भेट दिली. समितीच्या पहाणीच्या वेळी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जेवण देण्यात येत होते. त्यावेळी विद्यार्थ्यांकडे चौकशी केली असता विद्यार्थ्यांना पुरेसे जेवण



देत नसल्याचे समितीला आढळून आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अंडी व मटण देण्यात येत नसल्याचेही सांगण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांना महिन्यातून देण्यात येणारे साहित्यही पुरेसे दिले नसल्याचे आढळून आले. अनेक विद्यार्थ्यांकडे गणवेश नव्हता, आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता एकूण २२ शिक्षक असून स्वयंपाकगृहामध्ये एकूण १५ कर्मचारी कार्यरत असल्याचे सांगण्यात आले. समितीच्या पाहणीनंतर सदर आश्रमशाळेमधील गैरव्यवस्थेला व निष्कळजीपणाला आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व अधीक्षक जबाबदार असल्यामुळे त्यांना तात्काळ निलंबित करण्याचे निदेश मा.समिती प्रमुखांनी प्रकल्प अधिका-यांना दिले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी शासकीय आश्रम शाळेत आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

प्रकल्प कार्यालयाचे दिनांक १३ जानेवारी, २०११ रोजीच्या पत्रानुसार मुख्याध्यापक व अधीक्षक, शासकीय आश्रमशाळा, तवा, ता. डहाणू, जि. ठाणे यांना निलंबित करण्यांत आले होते व त्याची विभागीय चौकशी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोईसुविधा देण्यांत आल्या आहेत व देत आहेत.

**(६) रानशेत आश्रमशाळा :-**

समितीने उपरोक्त आश्रमशाळेला भेट दिली. समितीने इयत्ता दहावीच्या वर्गाला भेट देऊन तेथील

विद्यार्थ्यांची गणित व इंग्रजी विषयांची चाचणी घेतली. त्यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना १६ चा पाढा म्हणून दाखविता आलेला नाही. तसेच, इंग्रजी विषयातील शब्दांचे अचूक स्पेलिंग लिहून दाखविता आले नाही. विद्यार्थ्यांकडे चौकशी केली असता त्यांनी असे सांगितले की, दुपारचे जेवण १२ वाजता दिले जाते, त्यानंतर रात्रीचे जेवण संध्याकाळी ५.०० वाजता दिले जाते, परंतु पुरेसे जेवण दिले जात नाही.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी शासकीय आश्रम शाळेत आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढील प्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :–

प्रकल्प अधिकारी, डहाणू या कार्यालयाकडून दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यानुसार मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा रानशेत यांनी खुलासा सादर केलेला आहे. त्यानुसार गणित व इंग्रजी विषयाची अधिक तयारी करून घेण्यांत आली. शासनाच्या दिनचर्येप्रमाणे विद्यार्थ्यांना पुरेसे जेंवण दिले जाते. कर्मचारी शाळेजवळच्या परिसरात राहतात.

**(७) अंतर्गत रस्ता बांधकाम, वसुरी, ता. विक्रमगड :-**

समितीने वसुरी गावातील अंतर्गत रस्ता बांधकामाची पाहणी केली. ठक्करबाप्पा योजनेतून २००८-२००९ मध्ये रस्त्याचे काम करण्यात आले. रस्त्यांची एकूण लांबी ३०० मीटर असून ९ इंचाचे सोलींग केले

आहे. कॉन्क्रीटचे प्रमाणे १:४ असल्याचे सांगण्यात आले. समितीने रस्त्याची पाहणी केली असता काही ठिकाणी कॉन्क्रीटचा पृष्टभाग उखडलेला होता. रस्त्याच्या कामाची गुणवत्ता योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी आश्रम शाळेत सदर शासकीय आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली :—

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार विस्तारीत कार्यक्रम योजनेतंर्गत विक्रमगड तालुक्यातील मौजे-वसुरी येथील गावातंर्गत रस्त्याचे ०/०० ते ०/३०० कि. मी. पर्यतच्या काँक्रीटीकरण करण्याच्या कामांस रुपये- ५,८२,६९८/- रक्कमेस मंजूरी देण्यांत आलेली होती. सदरचे काम हे उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, विक्रमगड, जि. ठाणे यांचेमार्फत करण्यात आलेले असून, भेटीच्यावेळी काही ठिकाणी काँक्रीटचा पृष्ठभाग उखडलेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने कार्यकरी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार व उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, विक्रमगड यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. मौजे-वसुरी येथील काम केलेल्या ठिकाणी काँक्रीटचा पृष्ठभाग उखडलेला आहे. त्याठिकाणी पुन्हा नव्याने चांगल्या दर्जाचे कामकाज करण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागास देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार सदरहू विभागाने सदर काम नव्याने पूर्ण केले आहे. तसेच ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार विस्तारित कार्यक्रमातंर्गत घेण्यांत येणारी कामे ही अंदाजपत्रकानुसार व चांगल्या दर्जाची करण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागांना देण्यांत आलेल्या आहेत.

**(८) घरकुल योजना, देहरा, ता. जव्हार :-**

समितीने आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत देहरा येथे घेतलेल्या घरकुलांच्या कामाची पाहणी केली. आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत घरकुलासाठी १ लाख रुपये दिले जातात. त्या योजनेअंतर्गत शूर झलकारी कातकरी एकता महासंघास २०३ घरांची कामे देण्यात आली. त्यामध्ये देहरा येथील घरकुलांचा समावेश आहे. त्या संस्थेने विटा, लाद्या, रेती, सिमेंट, पत्रे दिले. लाभार्थीनी स्वतःची लाकडे वापरुन छप्पर तयार केलेले आहे. दारे खिडक्यांच्या चौकटी स्वतःच्या लावलेल्या आहेत. त्यांनी एकूण ४० ते ५० हजाराचे बांधकाम साहित्य पुरविले आहे. प्रत्येक घरकुलामागे ८० हजार रुपयांपर्यंत खर्च झालेला आहे. ५ टक्के रक्कम संस्थेला मिळावयाची बाकी आहे असे त्यांनी सांगितले.

दिनांक १२ सप्टेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली. साक्षीच्या वेळी घरकुल योजना, देहरा, येथे आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात पूर्तता करण्यात आल्याची पुढीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली :—

आदिवासी विकास विभागामार्फत बांधकाम करण्यात येणारी घरकुलांची बांधकामे शासन निर्णय, दिनांक ३० जुलै, २००८ मध्ये नमूद केलेल्या टाईप प्लॅनप्रमाणे तसेच दिलेल्या अटी व शर्तीनुसार करून घेण्याबाबतची कार्यवाही प्रकल्पस्तरावरुन केली जाते. मौजे-देहरा येथील घरकुलांची बांधकामे ही शुल



झलकारी कातकरी एकता महासंघ, ठाणे या संस्थेमार्फत करण्यात आलेली आहेत. श्री.राम काळू भोये, यांनी भेटीच्यावेळी संस्थेने फक्त विटा, लाद्या, रेती, सिमेंट, पत्रे दिल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात घरकुलांची बांधकामे ही संस्थेनीच केलेली आहेत. व घरकुल बांधकामाच्यावेळी स्वतः लाभार्थ्यांनी काम केल्याने त्यांना अदा करावयाच्या मजुरीची रक्कमसुध्दा संबंधित संस्थेने अदा केलेली आहे. लाभार्थ्यांनी जरी स्वतःच्या दारे, खिडक्यांच्या चौकटी लावलेल्या असल्यातरी त्याची होणारी किंमतसद्धा संस्थेने लाभार्थ्यास अदा केलेली आहे. तसेच घरकुलामध्ये समाविष्ठ केलेल्या शौचालयाचे सुद्धा बांधकाम संस्थेने पूर्ण करून दिलेले आहे.

संस्थेस प्रकल्प कार्यालयामार्फत घरकुलांच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार रक्कम अदा केली जाते. त्यामुळे संबंधित ८० टक्के रक्कम अदा करण्यात आलेली होती. तद्‌नंतर उर्वरित २० टक्के रक्कम संस्थेस अदा करून त्यातील ५ टक्के रक्कम ही संबंधित लाभार्थ्यास देण्यात आलेली आहे.

